# लोकशाही टिकण्यासाठी मतदार नोंदणी आवश्यक




कार्यक्रमात बोलताना मुकेश हिवाळे. सोबत भालेराव, प्रा.तांदळे, प्रा.कोळी.

## देशमुख महाविद्यालयात तहसीलदार मुकेश हिवाळे

**शहर प्रतिनिधी** | भडगाव

भारतीय लोकशाही बळकट करण्यासाठी सर्वांनी मतदार नोंदणी करून सहकार्य करावे. देशातील सर्व घटकांना मतदान प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगातर्फे विविध उपक्रम राबवण्यात येतात. विद्यार्थ्यांनी अशा राष्ट्रीय उपक्रमांमध्ये सहभागी होऊन आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन तहसीलदार मुकेश हिवाळे यांनी मंगळवारी येथे केले. येथील रजनीताई नानासाहेब देशमुख महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभाग व निवडणूक साक्षरता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजि राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एन.एन. गायकवाड होते.

यावेळी विद्यार्थ्यांकडून मतदार प्रतिज्ञा म्हणवून घेण्यात आली. २५ जानेवारी हा भारत निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस असून तो 'राष्ट्रीय मतदार दिवस' म्हणून संपूर्ण देशात सन २०११ पासून साजरा केला जातो. यानिमित्त १८ वर्षांवरील युवकांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठी प्रवृत्त करण्यात येते. त्याचा युवकांनी फायदा घ्यावा, असे मत प्राचार्य गायकवाड यांनी व्यक्त केले. नव मतदारांना मतदान कार्ड वितरित करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार भालेराव, प्रा. कोळी, प्रा.तांदळे उपस्थित होते.



# भडगाव महाविद्यालयातर्फे स. ध. भावसार यांचा सत्कार

**पारोळा ।** भडगाव येथील र. ना. देशमुख महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त येथील राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श निवृत्त शिक्षक सदानंद धडू भावसार यांना मराठी भाषेसाठीच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरव करण्यात आला. प्रा.डॉ. अतुल देशमुख, प्रा.डॉ. दीपक मराठे, प्रा. अविनाश भंगाळे व प्रा. दिनेश तांदळे यांनी पारोळा येथील भावसार सरांच्या निवासस्थानी त्यांचा सत्कार केला आणि आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भावसार यांचे कौतुक केले आहे. या वेळी भावसार सरांनी महाविद्यालयाचे चेअरमन संजय वाघ, प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड व प्रा.डॉ. अतुल देशमुख यांचे आभार व्यक्त केले.

# साहित्यातून भांडवलशाही शोषणव्यवस्थेवर भाष्य हवे

## प्रा. डॉ. डाखोरे : देशमुख महाविद्यालयात वाङ्मय अभ्यास मंडळाचे उद्घाटन

**सकाळ वृत्तसेवा**



प्रा. डॉ. डाखोरे

भडगाव, ता. २२ : येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वाङ्मय अभ्यास मंडळाचे उद्घाटन झाले. प्रसिद्ध कवी, कथाकार व समीक्षक प्रा. डॉ. सखाराम डाखोरे (अण्णासाहेब वर्तक मानव्य महाविद्यालय, वसई, जि. पालघर) उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड अध्यक्षस्थानी होते. डॉ. सखाराम डाखोरे म्हणाले, की वाङ्मय मंडळाच्या माध्यमातून महाविद्यालयामधील तरुणाईला सकारात्मक ऊर्जा दाखविण्याचे एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध होते. कथा, कविता, निबंध, वक्तृत्व, अभिनय अशा विविध माध्यमांतून विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळतो. एक कवी म्हणून असा अनुभव आहे, की कविता ही वेदनेतून जन्म घेते. साहित्य समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. साहित्याने भांडवलशाही व्यवस्थेवर भाष्य केले पाहिजे. राजकीय व्यवस्थेला प्रश्न विचारले पाहिजेत. तेव्हाच ते साहित्य समाजाभिमुख बनते. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांचा साहित्याने सतत जागर करायला हवा. विज्ञानाचा जन्मसुद्धा निसर्गातूनच होतो. त्यामुळे भांडवलशाही व्यवस्थेने निसर्गाविरुद्ध उभे केलेले षडयंत्र साहित्याने लोकांपुढे मांडले पाहिजे.

डॉ. डाखोरे यांनी आपल्या अनेक बहारदार कविता गेय पद्धतीने सादर केल्या. 'शेतामध्ये राबती कष्टती अपार। मायबाप माझे इळा कोयत्याची धार'' ही अत्यंत गाजलेली स्वतःची कविता सादर केली. त्यांनी आपल्या कवितांबरोबरच वाहरू सोनवणे, भूजंग मेश्राम, दासू वैद्य आणि इतर कवींच्या कवितासुद्धा सादर केल्या.

प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. मराठी विभागप्रमुख डॉ. अतुल देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. दीपक मराठे यांनी आभार मानले. ऑनलाइन झालेल्या या कार्यक्रमाला प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# 'मी रक्तदाता' नोंदणी अभियानास प्रतिसाद

## १०० दात्यांनी उत्स्फूर्त नोंदवला उपक्रमात सहभाग

**प्रतिनिधी | भडगाव**

ऑनलाइन मी रक्तदाता नोंदणी अभियानास भडगाव तालुक्यातून प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत जवळपास १०० दात्यांनी नोंदणी केली आहे.

अनेकदा अपघात अथवा शस्त्रक्रियेप्रसंगी अचानक रुग्णास तातडीची रक्ताची गरज भासते. भडगाव तालुक्याच्या ठिकाणी एकही रक्तपेढी नसल्याने रक्तदात्यांना शोधण्यासाठी नातेवाइकांना प्रचंड धावपळ करावी लागते. कोरोनाच्या काळात तर आता रक्तपेढ्यांमध्येही रक्ताचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. या समस्येतून मार्ग काढावा, या उद्देशाने येथील शिक्षक योगेश सुभाष शिंपी यांनी एक अनोखा मार्ग शोधून काढला आहे. ऑनलाइन गुगल अर्जाची निर्मिती करून 'मी रक्तदाता नोंदणी अभियान' त्यांनी सुरु केले आहे. ज्यात आतापर्यंत जवळपास १०० दात्यांनी नोंदणी केली आहे. यामुळे भविष्यात कुणाला आपत्कालीनप्रसंगी रक्ताची गरज भासल्यास नातेवाइकांना रक्तदात्यांची नावे, मोबाइल क्रमांक कळवले जातील. ज्यामुळे काही क्षणात रक्त उपलब्ध होऊन एखाद्याचा जीव वाचू शकेल. या कामासाठी शिंपी यांना भडगाव महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा.डॉ. दिनेश तांदळे व त्यांच्या विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभत आहे. योगेश शिंपी यांनी राबवलेल्या या आगळ्या-वेगळ्या अभियानाचे समाजातील सर्व-स्तरातून कौतुक होत आहे. 'रक्तदाता' म्हणून नागरिकांनी नोंदणी करावी व रक्तदान कार्यात सहभागी व्हावे, असे योगेश शिंपी यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे कळवले आहे.

# देशमुख महाविद्यालयात खो-खो स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**

भडगाव ता. १७ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या एरंडोल विभागीय आंतरमहाविद्यालयीन खो-खो (पुरुष व महिला) स्पर्धा भडगाव येथील रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर पार पडल्या. स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व भडगाव नगर परिषदेच्या माजी नगरसेविका प्राजक्ता देशमुख यांच्या हस्ते पार झाले. उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी धनदाई महाविद्यालय, अमळनेर येथील शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. शैलेश पाटील (सचिव एरंडोल विभाग क्रीडा समिती), न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील कला महाविद्यालय, मारवड येथील शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. देवदत्त पाटील, डीडीएसपी महाविद्यालय, एरंडोल येथील शारीरिक शिक्षण संचालक प्रा. के. जे. वाघ, प्रताप महाविद्यालय, अमळनेर येथील शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सचिन पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



भडगाव : खो-खो स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर.

स्पर्धेचे पंच म्हणून जळगाव जिल्हा असोसिएशनचे सुशांत जाधव, प्रेमचंद चौधरी, विशाल पाटील, दिलीप चौधरी यांनी कामगिरी पाहिली.

पुरुष संघांमध्ये प्रताप महाविद्यालय, अमळनेरचा संघ विजेता ठरला. डीडीएसपी महाविद्यालय, एरंडोलचा संघ उपविजेता ठरला तर तृतीय क्रमांक रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भडगावच्या संघाने पटकावला.

महिला संघांमध्ये रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भडगावचा संघ विजेता झाला. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगावचा संघ उपविजेता ठरला तर तृतीय क्रमांक प्रताप महाविद्यालय, अमळनेरच्या संघाने प्राप्त केला.

क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. एल. जी. कांबळे, पदार्थविज्ञान विभागप्रमुख डॉ. दीपक मराठे, प्रा. संजय झाल्टे, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. सचिन हडोळतीकर, मराठी विभागप्रमुख डॉ. अतुल देशमुख, अरुण वाणी, रवींद्र महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी क्रीडा समिती, माजी खेळाडू संघ व विद्यार्थी-खेळाडू यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा भरपूर प्रतिसाद मिळाला.

# देशमुख महाविद्यालयात ज्येष्ठ नागरिक मेळावा

**सकाळ वृत्तसेवा**



**भडगाव : गरीब विद्यार्थ्याला धनादेश वितरित करताना व्ही. टी. जोशी, दत्तात्रय पवार, नानासाहेब देशमुख आदी.**

भडगाव, ता. १० : सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ज्येष्ठ नागरिक मेळावा घेण्यात आला. याप्रसंगी पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष व्ही. टी. जोशी होते. संस्थेचे ज्येष्ठ संचालक नानासाहेब देशमुख, दत्तात्रय पवार, प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड, जनकल्याण ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष साहेबराव महाजन, माजी अध्यक्ष अनिल पवार, सौ. सु. गि. पाटील माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी मुख्याध्यापक सुनील पाटील, डॉ. मधुकर सोनवणे, डॉ. सी. एन. पाटील हे व्यासपीठावर उपस्थित होते. महाविद्यालयाचा शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग तसेच जागृती मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला.

या वेळी सुनील पाटील म्हणाले, की प्रत्येक माणसाने आपल्या आयुष्यातील उत्तरकाळ समाधानाने जगायला हवा. त्यासाठी सर्व रंगांनी बहरलेले आयुष्य समरसून जगता आले पाहिजे.

अध्यक्षीय मनोगतात व्हीं. टी. जोशी म्हणाले, की आपल्या आयुष्यातील वृद्धापकाळ सुखकर करायचा असेल तर त्यासाठी आधीच नियोजन करायला हवे. या वेळी डॉ. मधुकर सोनवणे यांच्या कन्या प्राजक्ता सोनवणे यांच्या संकल्पनेतून व सहकार्याने सुरू असलेल्या वृक्षारोपण मोहिमेंतर्गत मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. क्रीडा विभागाच्या ''वन डे, वन रुपी'' या योजनेतून राजेंद्र वाडवे या गरीब विद्यार्थ्याला मान्यवरांच्या हस्ते आर्थिक मदत म्हणून धनादेश वितरित करण्यात आला.

कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव चेंडूराम पवार, गणेश पूर्णपात्री, लता पाटील, अनिल पवार, मोतीलाल नरवाडे, अरुण पवार, अॅड. प्रकाश तिवारी, हिरे गुरुजी, दिलीप सहस्त्रबुद्धे, शरद तहसीलदार, एकनाथ केदार, मोरसिंग राठोड, शांताराम कोळी, गुलाबराव जाधव, जागृती मित्रमंडळाचे सुरेश भंडारी, योगेश शिंपी हे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. क्रीडा संचालक डॉ. दिनेश तांदळे यांनी भूमिका मांडली. डॉ. दीपक मराठे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अतुल देशमुख यांनी आभार मानले.

# ‘जागतिक ज्येष्ठ नागरिक’ दिनानिमित्त मेळावा आयोजित

▸▸ भडगाव । प्रतिनिधी

सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ‘ज्येष्ठ नागरिक मेळावा’ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन व्ही.टी. जोशी होते. संस्थेचे ज्येष्ठ संचालक नानासाहेब बबनराव देशमुख, दत्तात्रय पवार, प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड, जनकल्याण ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष साहेबराव महाजन, माजी अध्यक्ष अनिल पवार, सौ.सु.गि.पाटील माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी मुख्याध्यापक सुनील पाटील, डॉ. मधुकर सोनवणे, डॉ. सी. एन. पाटील यांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी बोलताना सुनील पाटील म्हणाले की, प्रत्येक माणसाने आपल्या आयुष्यातील उत्तरकाळ समाधानाने जगायला हवा. त्यासाठी सर्व रंगांनी बहरलेले आयुष्य समरसून जगता आले पाहिजे. आयुष्य खर्या अर्थाने समजून घ्यायचे असेल तर ज्ञानेश्वर, तुकाराम, शेक्सपिअर यांचे साहित्य समजून घेता आले पाहिजे. महात्मा गांधींचा विचार आणि आचार आपल्याला अंगिकारता यायला हवा. तेव्हाच या मानवी जीवनाचे खरे मर्म आपल्याला कळेल. वि. वा. शिरवाडकर यांच्या मनटसम्राटफ या नाटकातील अप्पासाहेब बेलवलकर यांच्याप्रमाणे कष्ट करून कमावलेली आयुष्याची सगळी जमापुंजी गुलालबुक्क्याप्रमाणे उधळून दिल्यानंतर आपला वृद्धापकाळ सुखकर व्हावा, याचीही आपण काळजी घेणे आवश्यक आहे.

यावेळी डॉ. मधुकर सोनवणे यांच्या कन्या प्राजक्ता सोनवणे यांच्या संकल्पनेतून व सहकार्याने सुरू असलेल्या वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव चेंडूराम पवार, गणेश पूर्णपात्री, लताताई पाटील, अनिल पवार, मोतीलाल नरवाडे, अरुण पवार, प्रकाश तिवारी, हिरे गुरुजी, दिलीप सहस्त्रबुद्धे, शरद तहसीलदार, एकनाथ केदार, मोरसिंग राठोड, शांताराम कोळी, गुलाबराव जाधव, जागृती मित्र मंडळाचे सुरेश भंडारी, योगेश शिंपी हे उपस्थित होते.



कार्यक्रमाचे स्वागतपर प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एन.एन. गायकवाड यांनी केले. शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. दिनेश तांदळे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका मांडली. सूत्रसंचालन डॉ. दीपक मराठे यांनी केले तर डॉ. अतुल देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व माजी विद्यार्थी हे यावेळी उपस्थित होते.

# सौ.र.ना.देशमुख महाविद्यालयात सद्भावना पंधरवड्याचे आयोजन

>> भडगाव । प्रतिनिधी



सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'सद्भावना पंधरवड्या'चे आयोजन करण्यात आले आहे. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती यावेळी मसद्भावना दिनफ म्हणून साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे सेवानिवृत्त इतिहास विभागप्रमुख प्रा. डी. टी. काळे यांच्या हस्ते राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.जी.एस. अहिरराव यांनी राजीव गांधी यांचे चरित्र व त्यांनी भारताच्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात दिलेले अमूल्य योगदान, याविषयी आपले विचार व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. २० ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या कालावधीत 'सद्भावना पंधरवडा' साजरा करण्यात येणार असून त्यानिमित्त विविध कार्यक्रम, स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी व माजी विद्यार्थी उपस्थित होते. महिला साहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. आर.एम. गजभिये यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# देशमुख महाविद्यालयात केले वृक्षारोपण

लोकमत न्यूज नेटवर्क

**भडगाव** : येथील रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात कै. लक्ष्मीबाई ओंकार वाघ यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते कै. लक्ष्मीबाई वाघ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार दिलीप ओंकार वाघ, संस्थेचे चेअरमन संजय ओंकार वाघ, ज्येष्ठ संचालक नानासाहेब देशमुख, दत्तात्रय पवार, विनय जकातदार, सतीश चौधरी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एन.गायकवाड, सु.गि.पाटील विद्यालय व ज.ग.पूर्णपात्री कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य विश्वास साळुंखे, माजी नगराध्यक्ष श्यामकांत भोसले, माजी नगरसेविका योजना पाटील, नितीन तावडे, उपस्थित होते.

# देशमुख महाविद्यालयात वृक्षारोपण

भडगाव, ता. १ : येथील सौ.रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात (कै.) लक्ष्मीबाई ओंकार वाघ यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

या वेळी पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार दिलीप वाघ,



**भडगाव : वृक्षारोपणप्रसंगी माजी आमदार दिलीप वाघ, संजय वाघ आदी.**

संस्थेचे चेअरमन संजय वाघ, ज्येष्ठ संचालक नानासाहेब देशमुख, दत्तात्रय पवार, विनय जकातदार, सतीश चौधरी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड, सु. गि. पाटील विद्यालय व सौ. ज. ग. पूर्णपात्री कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य विश्वास साळुंखे, माजी नगराध्यक्ष श्यामकांत भोसले, माजी नगरसेविका योजना पाटील, नितीन तावडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे भडगाव तालुकाध्यक्ष संतोष जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पाचोरा तालुकाध्यक्ष विकास पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या भडगाव महिला शहराध्यक्ष रेखा पाटील, डी. डी. पाटील, स्वप्नील पाटील, भडगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी, सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या बाबींचा

# प्रा. सुनील शेलार यांना रसायनशास्त्र विषयात पीएच.डी. घोषित

**प्रतिनिधी | भडगाव**

पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेच्या सौ. रजनीताई नानासाहेब



देशमुख महा विद्यालयातील प्रा. सुनील गणपत शेलार यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने विज्ञान विद्या शाखेतील रसायनशास्त्र विषयातून पीएच.डी. पदवी घोषित केली.

त्यांनी पारोळा येथील किसान महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ. गुणवंत सोनवणे यांच्या मार्गदर्शनात 'डेव्हलपमेंट ऑफ लो कॉस्ट अँडव्हान्स ऑक्सिडेशन प्रोसेस फॉर रेमुव्हल ऑफ ऑरगॅनिक मोईटिज - ए कायनेटीक, मेकॅनिस्टिक अँड थर्मोडायनॅमिक अप्रोच' या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले. संस्थेच्या वतीने चेअरमन संजय वाघ, व्हा.चेअरमन व्ही.टी. जोशी यांनी प्रा.शेलार यांचा सत्कार केला. यावेळी संचालक मंडळ, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# करिअर कट्टा उपक्रमात सहभागींना पुरस्कार जाहीर

## डॉ. अहिरे उत्कृष्ट प्राचार्य, तर उत्कृष्ट समन्वयक डॉ. नांद्रे

सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता.११ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राच्या अंतर्गत सुरु केलेली करिअर कट्टा या उपक्रमात पुरस्कार घोषित केले आहेत. उत्कृष्ट प्राचार्य साक्री येथील सी. गो. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, राज्यस्तरीय विभागीय समन्वयक पुरस्कार दहिवेल महाविद्यालयातील डॉ. सचिन नांद्रे यांना जाहीर झाला आहे. स्मृतिचिन्ह, प्रशिस्तिपत्र व रोख रक्कम पुरस्काराचे स्वरूप आहे. पंचवीस फेब्रुवारीस मुंबई विद्यापीठात उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होईल. जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय अशी स्पर्धा घेतली होती.

करिअर कट्टा उपक्रमात आयएएस व उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयातील प्रथम वर्षापासून ते तृतीय वर्ष विद्यार्थिनींसाठी स्पर्धा परीक्षा झाली. करिअर कट्टा उपक्रमात दररोज ऑनलाइन एक अधिकारी मार्गदर्शन करीत होते. महाविद्यालयातील विद्यार्थिनींना सहभागी होण्यासाठी विद्यार्थी प्रेरित करणाऱ्या महाविद्यालयीन समन्वयक, प्राचार्य, विभागीय समन्वयक यांना पुरस्कार देऊन गौरविणार आहे.

जळगाव विभागातून जिल्हानिहाय उत्तेजनार्थ महाविद्यालयात मु. जे महाविद्यालय (जळगाव), प्रताप महाविद्यालय (अमळनेर), धनाजी नाना




डॉ. राजेंद्र अहिरे डॉ. सचिन नांद्रे

महाविद्यालय (फैजपूर), सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (भडगाव), धुळे जिल्ह्यातून उत्तमराव पाटील महाविद्यालय (दहिवेल), सी. गो. पाटील महाविद्यालय (साक्री), जे. के. आदर्श कला महाविद्यालय (निजामपूर), पी. बी. बागल महाविद्यालय (दोंडाईचा), झेड. बी. पाटील महाविद्यालय (धुळे), एसएनडीटी महिला महाविद्यालय (धुळे), श्रीमती एन. एन. चौधरी महाविद्यालय (कुसुंबा), नंदुरबार जिल्ह्यातून विधी महाविद्यालय (नंदुरबार), कला-वाणिज्य महाविद्यालय (तळोदा), महाराज जे. पी. वळवी महाविद्यालय धडगाव, जी टी पाटील महाविद्यालय (नंदुरबार), डी. एन. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय (शहादा), उत्कृष्ट राज्यस्तरीय जिल्हा समन्वयक म्हणून डॉ. गौतम मौर्य कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तळोदा, उत्कृष्ट राज्यस्तरीय महाविद्यालयीन समन्वयक म्हणून प्रा. राजेंद्र ब्राह्मणे एस.एन.डी.टी महिला महाविद्यालय धुळे, डॉ. एन. एल. वाले पी. ची. बागल महाविद्यालय दोंडाईचा आदींचा समावेश आहे.

# प्रा. अविनाश भंगाळे यांना पीएच.डी. जाहीर

प्रतिनिधी | भडगाव

येथील रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील



प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्रा. अविनाश नामदेव भंगाळे यांना नुकतीच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने विज्ञान विद्या शाखेतील प्राणिशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी जाहीर केली आहे. त्यांना विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. बी. व्ही. पवार यांच्या हस्ते नोटिफिकेशन देण्यात आले. हिस्टोपॅथॉलॉजिकल अ‍ॅन्ड हिस्टोकेमिकल स्टडिज् ऑफ कॅपरा हिरकस इंटेस्टाईन इन्फेक्टेड बाय सिस्टोड पॅरासाइट्स फ्रॉम भडगाव अ‍ॅन्ड पाचोरा रिजन हा प्रा. भंगाळे यांच्या संशोधनाचा विषय होता. त्यांना संशोधनासाठी चाळीसगाव येथील नानासाहेब यशवंतराव नारायणराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. अजित कळसे यांचे मार्गदर्शन लाभले. याबद्दल त्यांचे संस्थेचे संचालक, मित्र तसेच नातेवाईकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

# रजनीताई देशमुख महाविद्यालयातील कार्यशाळेत स्पर्धा परीक्षेविषयी मार्गदर्शन

**लोकसत्ता वृत्तविभाग**

**जळगाव** - स्पर्धा परीक्षांचे योग्य नियोजन करावे. कोणतीही परीक्षा ही मेहनतीन वे जिद्दीने यशस्वी होऊ शकते. आयएएस, आयपीएस परीक्षा उत्तीर्ण करणारे साधारण विद्यार्थी जास्त प्रमाणात आहेत.

ही परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी जिद्द आणि संयमाची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन सुर्वे पाटील यांनी केले.

पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख महाविद्यालयात शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे सुरू करण्यात आलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत तीनदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली, त्या वेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड अध्यक्षस्थानी होते. डॉ. गायकवाड यांनी महाविद्यालयात राबवत असलेल्या उपक्रमांचा विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन केले. महाविद्यालयामध्ये ग्रंथालय सुविधा, विविध वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके यांचा जास्तीत जास्त वापर करून आपली ध्येयपूर्ती करावी, असे मत त्यांनी व्यक्त केले. समन्वयक प्रा. डॉ. बी. एस. भालेराव यांनी करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आपली नोंदणी पूर्ण करावी. वर्षभर या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे, असे सांगितले. याप्रसंगी कला व वाणिज्य शाखेचे समन्वयक डॉ. एस. डी. भसे, डॉ. एस. जी. शेलार उपस्थित होते. प्रा. प्रदीप वाघ यांनी सूत्रसंचालन केले. उद्योजकता समन्वयक डॉ. जी. डी. चौधरी यांनी आभार मानले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजन

# भडगाव महाविद्यालयात रंगले कविसंमेलन

लोकमत न्यूज नेटवर्क

भडगाव : 'माय म्हणे मायले बठ्ठा लेकरे प्यारा,
पन तिज म्हणे एक हातना बोटे न्यारान्यारा'

आई आणि मुलांमधील नाते स्पष्ट करणारी ही अहिराणी कविता कवी डॉ. वाल्मीक अहिरे यांनी सादर करून रसिकांना अंतर्मुख केले.

निमित्त होते, रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित कविसंमेलनाचे.

'मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या'निमित्त मराठी विभाग आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा भडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने या कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

कविसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून



डॉ. वाल्मीक अहिरे यांनी या कविता सादर केल्या. अमरावती येथील कवी डॉ. स्वप्निल देशमुख यांच्या सामाजिक कवितेने श्रोत्यांना विचार करायला भाग पाडले. ते आपल्या कवितेमध्ये म्हणतात,

'समाजातील विदारक वास्तव पाहतो मी,
हृदयाला पेटविणारा विस्तव पाहतो मी
मन माझे व्याकूळ होते जेव्हा जेव्हा कविता असते,
सोबतीला एकांतात राहतो मी'

समाजातील आपल्या आजूबाजूचे दुःख पाहून व्याकूळ होणाऱ्या कोणत्याही संवेदनशील माणसाला ही कविता भावून जाते. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या 'जगणं-मरणं दोन श्वासाचं अंतर' या कवितेची आठवण करून देणारी ही कविता भाव खाऊन गेली. मूर्तिजापूर येथील युवा कवी श्रीकांत राऊत यांनी सादर केलेल्या कवितेतून व्यवस्थेविरुद्ध भाष्य केले. मलकापूर येथील विद्यार्थी कवी सौरभ हिवराळे याने माणसातील खोट्या संवेदनशीलतेचा बुरखा टराटरा फाडणारी कविता सादर केली.

उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या कविसंमेलनातील कवितांना महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व उपस्थित मान्यवरांनी भरभरून दाद दिली.

## जागतिकीकरणातील होरपळणारी माणसं..

धुळे येथील युवा कवी प्रवीण पवार यांनी जागतिकीकरणातील माणसाची होत जाणारी होरपळ कवितेतून अधोरेखित केली.

'गुगलच्या बांधावर बसून
तुम्हाला खरंच कळतंय का
आमचं शेती मातीतलं दुःख
विविध वेबसाईटवर जाऊन कृत्रिम
अनुभवात तुम्ही जास्त रमणार नाही
पण एक सांगतो तुम्हाला भाकर
डाऊनलोड करणं जमणार नाही.'

जग कितीही आधुनिक तंत्रज्ञानाने समृद्ध झाले तरी शेतीतल्या आणि काळ्या मातीतल्या माणसाचं दुःख हे अघोरी जागतिकीकरण समजून घेण्यास तयार नाही. हेच दुःख कवी प्रवीण पवार यांनी मांडलं.

# महाविद्यालयात 'करिअर कट्टा' कार्यशाळा

**भडगाव, ता. ३ :** पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सुरू केलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत तीनदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या वेळी शासनाच्या 'करिअर कट्टा' उपक्रमप्रसंगी प्रमुख पाहुणे व प्रमुख वक्ते म्हणून जळगाव येथील श्री. सुर्वे पाटील उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, की स्पर्धा परीक्षांचे योग्य नियोजन करावे, कोणतीही परीक्षा ही मेहनतीने जिद्दीने यशस्वी होऊ शकते. आयएएस, आयपीएस परीक्षा उत्तीर्ण करणारे साधारण विद्यार्थी जास्त प्रमाणात आहेत. ही परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी जिद्द आणि संयमाची आवश्यकता आहे, असेही प्रतिपादन त्यांनी केले.



**भडगाव : रजनीताई देशमुख महाविद्यालयात 'करिअर कट्टा' कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मान्यवर.**

कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड उपस्थित होते. त्यांनी महाविद्यालयात राबवीत असलेल्या या उपक्रमांचा विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन केले. महाविद्यालयामध्ये ग्रंथालय सुविधा, विविध वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके यांचा जास्तीत जास्त वापर करून आपली ध्येयपूर्ती करावी, असे मत व्यक्त केले. करिअर कट्टाचे समन्वयक प्रा. डॉ. बी. एस. भालेराव यांनी बोलताना 'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आपली नोंदणी पूर्ण करावी. वर्षभर या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे, असे मत व्यक्त केले. या वेळी महाविद्यालयाचे कला व वाणिज्य शाखेचे समन्वयक डॉ. एस. डी. भसे, डॉ. एस. जी. शेलार उपस्थित होते. प्रा. प्रदीप वाघ यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. जी. डी. चौधरी (उद्योजकता समन्वयक) यांनी आभार मानले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर सहकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भडगाव तालुक्यात पुण्यतिथीनिमित्त महात्मा गांधींना अभिवादन

**प्रतिनिधी** | भडगाव

येथील रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महात्मा गांधींची पुण्यतिथी व हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे मानद सचिव स्वर्गीय ॲड. एस. आर. देशमुख यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणार्थ त्यांना अभिवादन करण्यात आले. प्रा. जनार्दन देवरे व अजय देशमुख यांनी महात्मा गांधी व ॲड. देशमुख यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड, संदीप केदार, प्रवीण तडवी, तुळशीराम महाजन हजर होते.

**टी .आर. पाटील विद्यालय**

तालुक्यातील वडजी येथील टी. आर. पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात रविवारी महात्मा गांधी यांची पुण्यतिथी व हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य ए. एस. पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या वेळी वरिष्ठ शिक्षक बी. वाय. पाटील, ई. एम. पाटील यांनी महात्मा गांधीचे कार्य आणि हुतात्मा दिनाविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन राकेश पाटील यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक, कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# भडगाव महाविद्यालयात मतदान दिवस

भडगाव : येथील रजनीताई नानासाहेब देशमुख महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभाग व निवडणूक साक्षरता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम उत्साहात झाला. यावेळी तहसीलदार मुकेश हिवाळे, प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड, निवडणूक शाखेचे नायब तहसीलदार भालेराव, प्रा. सुरेश कोळी, प्रा. दिनेश तांदळे उपस्थित होते. प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. दीपक मराठे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. देवेंद्र मस्की यांनी तर आभार प्रा. डॉ. अतुल देशमुख यांनी मानले.

# देशमुख महाविद्यालयात वाङ्‌मय अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन

**लोकसत्ता वृत्तविभाग**

**जळगाव** – भडगाव येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख महाविद्यलयात वाङःमय अभ्यास मंडळाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आणि कवी, समीक्षक तथा वसई येथील अण्णासाहेब वर्तक मानव्य महाविद्यलयाचे प्रा. डॉ. सखाराम डाखोरे यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्रा.डाखोरे यांनी एक कवी म्हणून असा अनुभव आहे की, कविता ही वेदनेतून जन्म घेते, असे सांगितले. वाङःमय मंडळाच्या माध्यमातून तरुणाईला आपल्यातील सकारात्मक ऊर्जा दाखविण्याचे एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध होते. साहित्य हे समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. साहित्याने भांडवलशाही व्यवस्थेवर भाष्य केले पाहिजे. राजकीय व्यवस्थेला प्रश्न विचारले पाहिजे, तेव्हाच ते साहित्य समाजाभिमुख बनते. भांडवलशाही व्यवस्थेने निसर्गाविरुद्ध उभे केलेले षडयंत्र साहित्याने लोकांपुढे मांडले पाहिजे. जल, जंगल आणि जमीन यांच्या रक्षणासाठी साहित्याने उभे राहिले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले. डॉ. डाखोरे यांनी आपल्या अनेक कविता गेय पद्धतीने सादर केल्या. 'शेतामध्ये राबती कष्टती अपार... मायबाप माझे इळा कोयत्याची धार...' ही अत्यंत गाजलेली स्वतःची कविता सादर केली. त्यांनी आपल्या कवितांबरोबरच वाहरू सोनवणे, भुजंग मेश्राम, दासू वैद्य आणि इतर कवींच्या कवितासुद्धा सादर केल्या. प्राचार्य डॉ. गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी विभागप्रमुख डॉ. अतुल देशमुख यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. दीपक मराठे यांनी आभार मानले. दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित कार्यक्रमाला प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




भडगाव : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना तहसीलदार मुकेश हिवाळे.

# देशमुख महाविद्यालयात मतदार दिन

**भडगाव** : येथील रजनीताई नानासाहेब देशमुख महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभाग व निवडणूक साक्षरता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त कार्यक्रम झाला. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मतदार प्रतिज्ञा म्हणवून घेतली. या वेळी तहसीलदार मुकेश हिवाळे, प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी नवमतदारांना मतदान कार्ड वितरित करण्यात आले. या प्रसंगी निवडणूक शाखेचे नायब तहसीलदार भालेराव, प्रा. कोळी, प्रा. तांदळे उपस्थित होते. विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. दीपक मराठे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. देवेंद्र मस्की यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. अतुल देशमुख यांनी आभार मानले.

र. ना. देशमुख महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धा

# देशमुख महाविद्यालय व प्रताप महाविद्यालय ठरले विजेते

लोकमत न्यूज नेटवर्क

**भडगाव :** उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या एरंडोल विभागीय आंतरमहाविद्यालयीन खो-खो (पुरुष व महिला) स्पर्धा भडगाव येथील रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर पार पडल्या.

उदघाटन महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व भडगावच्या माजी नगरसेविका प्राजक्ता देशमुख यांच्या हस्ते पार पडले.

अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील होते. याप्रसंगी धनदाई महाविद्यालय, अमळनेर येथील शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. शैलेश पाटील, न्हानाभाऊ मंसाराम तुकाराम पाटील कला महाविद्यालय, मारवड येथील शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. देवदत्त पाटील, डीडीएसपी महाविद्यालय, एरंडोल येथील शारीरिक शिक्षण संचालक प्रा. के. जे. वाघ, प्रताप महाविद्यालय, अमळनेर येथील शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सचिन पाटील यांची उपस्थिती होती. पंच म्हणून जळगाव जिल्हा असोसिएशनचे सुशांत जाधव, प्रेमचंद चौधरी, विशाल पाटील, दिलीप चौधरी यांनी काम पाहिले.

उद्घाटनप्रसंगी प्रा. एल. जी. कांबळे, पदार्थविज्ञान विभागप्रमुख डॉ. दीपक मराठे, प्रा. संजय झाल्टे, वाणिज्य विभागप्रमुख डॉ.सचिन हडोळतीकर, मराठी विभागप्रमुख डॉ. अतुल देशमुख, अरुण वाणी, रवींद्र महाजन यांची उपस्थिती होती.



भडगाव महाविद्यालयात उदघाटनप्रसंगी उपप्राचार्य एस. आर. पाटील, प्राजक्ता देशमुख व प्राध्यापक.

## हे संघ ठरले विजेते

- पुरुष संघांमध्ये प्रताप महाविद्यालय,अमळनेरचा संघ विजयी झाला. डीडीएसपी महाविद्यालय, एरंडोलचा संघ उपविजेता ठरला तर तृतीय क्रमांक रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भडगावच्या संघाने पटकावला.
- महिला संघांमध्ये रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भडगावचा संघ विजयी झाला. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगावचा संघ उपविजेता ठरला तर तृतीय क्रमांक प्रताप महाविद्यालय, अमळनेरच्या संघाने मिळवला.

# सौ.र.ना. देशमुख महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

## जकातदार स्मृती करंडक स्पर्धेत नाशिकची श्रुती बोरस्ते विजेती

▸▸ भडगाव । प्रतिनिधी

सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्वर्गीय आबासाहेब मधुकर सदाशिव जकातदार (वकील) व स्वर्गीय वत्सलाबाई मधुकर जकातदार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे हे तिसरे वर्ष होते. आभासी (ऑनलाईन) पद्धतीने ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत नाशिक येथील एच.पी.टी. आर्टस् आणि आर.वाय.के. विज्ञान महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. श्रुती अशोक बोरस्ते हिने प्रथम क्रमांक पटकावला. तिला ५००० रूपये रोख , स्मृतिकरंडक व प्रमाणपत्र देण्यात आले. इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, सांगली (भारती विद्यापीठ, पुणे)चा विद्यार्थी शिवम संजय मालकर याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. त्याला ३०००रूपये रोख व प्रमाणपत्र देण्यात आले. प्रताप महाविद्यालय, अमळनेरचा विद्यार्थी जयेश संजय सोनार व बी.के. बिरला कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कल्याण येथील विद्यार्थी यश रवींद्र पाटील यांना तृतीय क्रमांक विभागून देण्यात आला. २०००रूपये व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. ५०० रूपयांची उत्तेजनार्थ पारितोषिके अनुक्रमे नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, इचलकरंजी येथील विद्यार्थी अक्षय मारुती शेळके व सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे येथील विद्यार्थिनी कु. समीक्षा ज्ञानेश्वर आव्हाळे यांनी प्राप्त केले.


श्रुती बोरस्ते


शिवम मालकर


यश पाटील


जयेश सोनार

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष प्राचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय ओंकार वाघ होते. उद्घाटक म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा.डॉ. बी.व्ही. पवार उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रकाश जकातदार (सेवानिवृत्त गणित विभागप्रमुख, सिद्धार्थ महाविद्यालय फोर्ट, मुंबई) उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा.जी. एस. अहिरराव यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. बी. एस. भालेराव यांनी केले.

पुरस्कार वितरण समारंभाचे अध्यक्ष पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक व स्पर्धेचे प्रायोजक विनय मधुकर जकातदार होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे ज्येष्ठ संचालक खलील देशमुख उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून सुनंदा जकातदार (नागपूर), प्रा. डॉ. प्रशांत देशमुख (रघुनाथराव भाऊराव गरुड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शेंदुर्णी) व प्रा. डॉ. दीपक मराठे (सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भडगाव) यांनी काम पाहिले. यावेळी रेखा जकातदार, उपप्राचार्य प्रा.एस.आर. पाटील यांची उपस्थिती होती. परीक्षकांच्या वतीने सुनंदा जकातदार यांनी स्पर्धेसंबंधीचे आपले मत नोंदवले. सूत्रसंचालन डॉ. अतुल देशमुख यांनी केले तर डॉ. सी. एस. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी मकोविड-१९ चा शिक्षणावरील परिणामम, 'ऑनलाइन शिक्षणपद्धती शिक्षणव्यवस्थेत बदल घडवू शकते काय ?', मनवीन शैक्षणिक धोरण आणि सद्यस्थितीफ आणि मनवीन कृषी कायदा आणि आजचा शेतकरीफ हे विषय देण्यात आले होते.स्पर्धेचे समन्वयक म्हणून डॉ.बी.एस. भालेराव यांनी जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# देशमुख महाविद्यालयात कोरोना लसीकरण शिबिर

▸▸ भडगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील वरिष्ठ महाविद्यालय प्रत्यक्ष पद्धतीने सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्याच अनुषंगाने सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आज प्रत्यक्ष वर्गांना सुरुवात झाली. शासनाच्या आदेशान्वये कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश देता येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी पहिल्याच दिवशी कोरोना लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांनी संयुक्तपणे ग्रामीण रुग्णालय भडगाव यांच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन केले. या शिबिरामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या अनेक विद्यार्थ्यांनी लस घेतली.

याप्रसंगी पहिल्याच दिवशी महाविद्यालयात उपस्थित झालेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्राचार्य डॉ. एन.एन. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. दीपक मराठे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना शासनाने दिलेली नियमावली व कोरोनासंबंधी घ्यावयाची काळजी, याविषयी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.जी.एस.अहिरराव, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

# भडगाव येथे लस देऊन केले विद्यार्थ्यांचे स्वागत



देशमुख महाविद्यालयात स्वागतानंतर विद्यार्थ्यांना लस देताना परिचारिका.

**शहर प्रतिनिधी | भडगाव**

राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या राज्यातील वरिष्ठ महाविद्यालय सुरू करण्याच्या निर्णयानुसार येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख महाविद्यालयात बुधवारी प्रत्यक्ष वर्गांना सुरुवात झाली. शासनाच्या आदेशान्वये कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश देता येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी पहिल्याच दिवशी कोरोना लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले.

विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांनी येथील ग्रामीण रुग्णालयाच्या सहकार्याने शिबिराचे आयोजन केले. त्यात अनेक विद्यार्थ्यांनी लस घेतली. पहिल्याच दिवशी महाविद्यालयात आलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्राचार्य डॉ.एन. एन. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. एस.आर. पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. दीपक मराठे यांनी यावेळी नियमावली व घ्यावयाची काळजी, याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.जी.एस. अहिरराव, सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**वाचन प्रेरणा दिन** • भडगाव येथील रजनीताई देशमुख महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात प्रतिपादन

# वाचनामुळे मनुष्य जीवनाचा दर्जा उंचावतो : अॅड.खान

शहर प्रतिनिधी | भडगाव



वाचन प्रेरणा दिनी डॉ.एपीजे अब्दुल कलामांच्या प्रतिमेला अभिवादन करताना उपस्थित मान्यवर.

वाचन हा मन आणि मेंदूसाठी व्यायाम आहे. वाचनामुळे मनाची एकाग्रता होण्यास मदत होते आणि मनुष्याला आनंद मिळतो. मात्र समाज माध्यमे आपल्या इतर क्षमतांना मारक ठरतात. त्यांच्या वापरामुळे डोळे, मेंदू आणि शरीरावर नकारात्मक परिणाम होतो. ते काही क्षणापुरता आनंद देतात; परंतु त्याचे दुष्परिणाम येणाऱ्या काळात दिसतील. त्यापेक्षा तरुणांनी वाचन करायला हवे. त्यामुळे मानसिक ताण कमी होतो आणि मनुष्याचे आयुष्य व आत्मविश्वास वाढतो. तसेच जगण्याचा दर्जाही उंचावतो, असे प्रतिपादन भुसावळ येथील सरकारी रेल्वे स्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक अॅड.आय. आय. खान यांनी येथे केले.

येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख महाविद्यालयात देशाचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. मराठी विभाग आणि ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून अॅड.खान बोलत होते. सर्वप्रथम डॉ.अब्दुल कलामांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ऑनलाइन पद्धतीने पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा.एस.आर. पाटील होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागप्रमुख डॉ.अतुल देशमुख यांनी तर प्रास्ताविक ग्रंथालय समितीचे अध्यक्ष प्रा.एम.डी. बिर्ला यांनी केले. तर आभार ग्रंथपाल प्रा.आर.एम. गजभिये यांनी मानले. डॉ.बी.एस. भालेराव यांनी तांत्रिक साहाय्य केले.

## प्रश्नमंजुषेतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान

डॉ.कलामांच्या चरित्रावर आधारित प्रश्नमंजुषा घेण्यात आली. त्यात प्रथम क्रमांक खुशी पटेल, द्वितीय क्रमांक रुचिता राजपूत तर तृतीय क्रमांक नीलेश सोनार या विद्यार्थ्याने पटकावला. अॅड.खान यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली.

# र. ना. देशमुख महाविद्यालयात क्रिकेट कॅम्प, विविध अभ्यासक्रमांचा शुभारंभ

**शहर प्रतिनिधी | भडगाव**

येथील रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विविध विभागांनी सुरू केलेल्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

वाणिज्य विभागाने सुरू केलेल्या सर्टिफिकेट कोर्स इन टॅक्सेशन ॲण्ड इन्शुरन्स या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा शुभारंभ पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन व्ही. टी. जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. त्याचप्रमाणे इंग्रजी विभागाने सुरू केलेल्या सर्टिफिकेट कोर्स इन डेव्हलपिंग स्पोकन ॲण्ड रिटन इंग्लिश स्किल्स या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा शुभारंभ संस्थेचे ज्येष्ठ संचालक नानासाहेब देशमुख यांच्या हस्ते तर अर्थशास्त्र विभागाने सुरू केलेल्या सर्टिफिकेट कोर्स इन कंझ्युमर बिहेव्हियर ॲण्ड मार्केटिंग रिसर्च या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा शुभारंभ संचालक दत्तात्रय पवार यांच्या हस्ते करण्यात आला. शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाने सुरू केलेल्या सर्टिफिकेट कोर्स इन योगा ॲण्ड प्राणायाम या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा शुभारंभ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे सिनेट सदस्य अमोल पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. क्रीडा विभागातर्फे क्रिकेट कॅम्पचा शुभारंभ करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड, डॉ. वसीम मिर्झा, अमोल पाटील, सुरेश भंडारी, योगेश शिंपी, मिलिंद बोरसे, सौरभ देशमुख, प्रेमचंद चौधरी, रवींद्र वाडेकर, अमित चावरेकर, भूषण वाडेकर, सनी राठोड, महेश पवार, पृथ्वी कोळी, अबुजर, कबीर शहा, अनुप तांदळे, जनकल्याण संस्थेचे सर्व सदस्यांची उपस्थिती होती.

# श्रमसंस्कार शिबिरातून विद्यार्थ्यांत रुजते सामाजिक बांधिलकी

भडगाव, दि. २३ (सा.वा.) - राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर हे महाविद्यालय आणि गाव यांना जोडणारा दुवा आहे. या शिबिराच्या माध्यमातून सामाजिक कामे केली जातात. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी रुजवण्याचे काम अशी शिबिरे करत असतात. देशाला उत्तम नागरिक द्यायचे असतील तर अशा शिबिरांची नितांत आवश्यकता आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांवर श्रम संस्कार केले जातात. आणि भविष्यात एक चांगला नागरिक म्हणून हा विद्यार्थी देश घडवतो, असे प्रतिपादन पाचोरा तालुका सहकारी (पीटीसी) शिक्षण संस्थेचे व्हा.चेअरमन व्ही.टी. जोशी यांनी केले.

पीटीसी संस्था संचालित येथील सौ.रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सातदिवसीय विशेष श्रम संस्कार शिबिराचा समारोप वडगाव बुद्रूक येथे झाला. त्यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जोशी बोलत होते. 'स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव' या मध्यवर्ती संकल्पनेनुसार पार पडलेल्या या शिबिरात ७५ युवक, युवती सहभागी झाले होते. समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पीटीसी संस्थेचे ज्येष्ठ संचालक विजय देशपांडे, समाधान पाटील, निवृत्त शिक्षक पद्मसिंग पाटील, निवृत्त मुख्याध्यापक एस.के. राठी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.एन. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. एस.आर. पाटील, डॉ.एस.डी. भैसे उपस्थित होते. शिबिराच्या सात दिवसांत श्रमदान, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, आपत्ती व्यवस्थापन, शौचालय निर्मिती आणि जनजागृतीसाठी महिला मेळावा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शिबिरात विविध विषयांवर विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

स्वतंत्र भारत जळगाव व्हिजन

स्वतंत्र विचारांचे.. स्वतंत्र व्यासपीठ !

दि. २३ मार्च २०२२ बुधवार ५

# देशमुख महाविद्यालयाचे विशेष श्रमसंस्कार हिवाळी शिबीर संपन्न

## भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' ही संकल्पना घेऊन वडगाव ।।बु।। येथे आयोजन

दै.उज्ज्वल स्वतंत्र भारत वृत्तसेवा

**भडगाव । प्रतिनिधी**

पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित, सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार हिवाळी शिबिर वडगाव ।।बु।। येथे संपन्न झाले. 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' या शिबिराची मध्यवर्ती संकल्पना होती. शिबिराच्या समारोप प्रसंगी अध्यक्ष म्हणून पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन व्ही.टी. जोशी उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले, की राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर हे महाविद्यालय आणि गाव यांना जोडणारा दुवा आहे. या शिबिराच्या माध्यमातून सामाजिक कामे केली जातात. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी रुजवण्याचे काम अशी शिबिरे करत असतात. देशाला



उत्तम नागरिक घावयाचे असतील तर अशा शिबिरांची नितांत आवश्यकता आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर श्रमसंस्कार केले जातात आणि भविष्यात एक चांगला नागरिक म्हणून हा विद्यार्थी देश घडवतो. समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक विजय देशपांडे, समाधान पाटील, निवृत्त शिक्षक पदमसिंग पाटील, निवृत्त मुख्याध्यापक एस.के. शर्मा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील, डॉ. एस.डी. भैसे उपस्थित होते. श्रमदान, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, आपत्ती व्यवस्थापन, शौचालय निर्मिती आणि जनजागृतीसाठी महिला मेळावा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरामध्ये सात दिवस करण्यात आले होते. 'स्वच्छ भारत-माझी वसुंधरा, जलसंवर्धन व व्यवस्थापन' या विषयावर भडगाव नगरपालिकेचे मुख्याधिकारी रवींद्र लांडे, 'जैवविविधतेत सर्पांचे महत्त्व' या विषयावर सर्पमित्र हर्षल भदाणे, 'सौर ऊर्जा वापर' या विषयावर चंद्रशेखर महाजन, 'महिलांचे आरोग्य' या विषयावरील महिला मेळाव्यात भडगाव पंचायत समितीच्या सभापती अर्चना पाटील, माजी नगरसेविका योजना पाटील, भडगाव तालुका महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष रेखा पाटील, बँक व्यवस्थापक कांचन अहिरे, सरपंच सविता पाटील, स्वप्नील पाटील, 'कृषी उत्पादन वाढीसाठी उपाययोजना' या विषयावर तालुका कृषी अधिकारी बी.बी. गोरडे, 'ग्रामविकासाच्या शासकीय योजना' या विषयावर डॉ. बी. एस. भालेराव, 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर डॉ. एस.डी. भैसे, 'वित्तीय व्यवस्थापन' या विषयावर डॉ. सचिन हडोळतीकर, 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन' या विषयावर संस्कृती फाउंडेशनचे संचालक डी. बी. कोळी व डोएश बँक, पुण्याचे मयूर महाजन तर 'जातीमुक्त भारत' या विषयावर डॉ. ए. एस. भंगाळे या मान्यवरांनी मार्गदर्शन केले. शिबिरादरम्यान कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे व इतर मान्यवरांनी सदिच्छा भेटी दिल्या आणि स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. विशेष उल्लेखनीय म्हणजे शिबिरात प्राथमिक आरोग्य केंद्र, कजगाव यांच्या सहकार्याने 'कोरोना लसीकरण कार्यक्रम' राबविण्यात आला. त्याचप्रमाणे जनावरांना लस, जंतांची तपासणी व टॅगिंग करून औषधी देण्यात आली. यासाठी कजगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे रमेश राठोड, मुकुंद वानखडे तसेच भडगाव पंचायत समितीचे पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. जी.एस. अहिरराव यांनी समारोपीय कार्यक्रमात शिबिराचा अहवाल सादर केला. महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. आर.एम. गजभिये यांनी आभार मानले. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.ए. कोळी, सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, तुळशीराम महाजन, मनोहर महाजन व स्वयंसेवकांनी शिबिराच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांनी श्रमदानातून बांधला बंधारा

## देशमुख महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिरांतर्गत वडगावला उपक्रम

सकाळ वृत्तसेवा

भडगाव, ता. २२ : पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचालित सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे सातदिवसीय विशेष श्रमसंस्कार हिवाळी शिबिर वडगाव बुद्रुक येथे झाले. 'स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव' ही शिबिराची मध्यवर्ती संकल्पना होती. शिबिरात विद्यार्थ्यांनी श्रमदानातून बंधारा बांधला.

शिबिराच्या समारोपप्रसंगी अध्यक्ष म्हणून पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष व्ही. टी. जोशी उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले, की हे शिबिर महाविद्यालय आणि गाव यांना जोडणारा दुवा आहे. शिबिराच्या माध्यमातून सामाजिक कामे केली जातात. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी रुजविण्याचे काम अशी शिबिरे करत असतात. समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक विजय देशपांडे, समाधान पाटील, निवृत्त शिक्षक पदमसिंग पाटील, निवृत्त मुख्याध्यापक एस. के. राठी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील, डॉ. एस. डी. भैसे उपस्थित होते.

श्रमदान, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, आपत्ती व्यवस्थापन, शौचालय निर्मिती आणि जनजागृतीसाठी महिला मेळावा असे विविध कार्यक्रम या शिबिरात झाले. 'स्वच्छ भारत-माझी वसुंधरा, जलसंवर्धन व व्यवस्थापन' या विषयावर भडगाव पालिकेचे मुख्याधिकारी रवींद्र लांडे, 'जैवविविधतेत सर्पांचे महत्त्व' या विषयावर सर्पमित्र हर्शल भदाणे, 'सौरऊर्जेचा वापर'वर चंद्रशेखर महाजन, 'महिलांचे आरोग्य' यावर महिला मेळाव्यात भडगाव पंचायत समितीच्या सभापती अर्चना पाटील,



वडगाव (ता. भडगाव) : श्रमदानातून बांधलेल्या बंधाऱ्यासह विद्यार्थी.

माजी नगरसेविका योजना पाटील, भडगाव तालुका महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष रेखा पाटील, बँक व्यवस्थापक कांचन अहिरे, सरपंच सविता पाटील, स्वप्नील पाटील, 'कृषी उत्पादन वाढीसाठी उपाययोजना'वर तालुका कृषी अधिकारी बी. बी. गोरडे, 'ग्रामविकासाच्या शासकीय योजना'वर डॉ. बी. एस. भालेराव, 'आपत्ती व्यवस्थापन'वर डॉ. एस.डी. भैसे, 'वित्तीय व्यवस्थापन'वर डॉ. सचिन हडोळतीकर, 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन'वर संस्कृती फाउंडेशनचे संचालक डी. बी. कोळी व डोएश बँक, पुण्याचे मयूर महाजन, तर 'जातीमुक्त भारत'वर डॉ. ए. एन. भंगाळे या मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

शिबिरादरम्यान कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे व इतर मान्यवरांनी सदिच्छा भेटी दिल्या आणि स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

शिबिरात प्राथमिक आरोग्य केंद्र, कजगाव यांच्या सहकार्याने 'कोरोना लसीकरण कार्यक्रम' राबविण्यात आला. त्याचप्रमाणे जनावरांना लस, जंतांची तपासणी व टॅगिंग करून औषधी देण्यात आली. यासाठी कजगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे रमेश राठोड, मुकुंद वानखडे, तसेच भडगाव पंचायत समितीचे पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. जी. एस. अहिरराव यांनी समारोपीय कार्यक्रमात शिबिराचा अहवाल सादर केला. महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. एम. गजभिये यांनी आभार मानले. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. ए. कोळी, सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, तुळशीराम महाजन, मनोहर महाजन व स्वयंसेवकांनी शिबिराच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. दरम्यान, प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए. एन. भंगाळे व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दिनेश तांदळे यांनी दररोज सकाळी स्वयंसेवकांचे प्राणायाम व योग प्रशिक्षण घेतले.

# देशमुख महाविद्यालयात कायदेविषयक मार्गदर्शन



भडगाव : महिलांसंबंधीचे कायदे हे स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आणि स्वतःला सक्षम करण्यासाठी आहेत. या कायद्यांचा दुरूपयोग होऊ नये. राष्ट्रमाता जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले या अगोदर स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या आणि त्यांनी महापुरुष घडवले आणि महापुरूषांना सोबत केली. महिलांच्या संरक्षणासाठी संविधानात अनेक कायद्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. या कायद्यांमुळे महिलांवर होणाऱ्या विविध प्रकारच्या अत्याचारांपासून तिला संरक्षण मिळते. समाजमाध्यमांच्या माध्यमातून आधुनिक काळात महिलांचे शोषण केले जाते. या शोषणाविरूद्ध आवाज उठवण्याची व्यवस्था प्रचलित कायद्यांमध्ये करण्यात आली आहे. या कायद्यांची गरज आपणास पडूच नये, असे वाटत असेल तर स्वतःला सक्षम करायला हवे. असे आवाहन ॲड. सुवर्णा मराठे यांनी केले.

सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित मार्गदर्शनपर कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. प्रास्ताविक युवती सभाप्रमुख डॉ. सी. एस. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.जी. एस. अहिरराव तर आभारप्रदर्शन महिला कार्यक्रमाधिकारी प्रा.आर.एम. गजभिये यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.दीपक मराठे, प्रा. एस. ए. कोळी, डॉ. अतुल देशमुख, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. जनार्दन देवरे, डॉ. गजानन चौधरी यांची उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

**दिव्य मराठी विशेष** • देशमुख महाविद्यालयात महिलांसाठीच्या कायदेविषयक कार्यक्रमात प्रतिपादन

# कायद्यांची गरज न भासता सक्षम व्हा : ॲड. मराठे

शहर प्रतिनिधी | भडगाव

महिलांच्या संरक्षणासाठी संविधानात अनेक कायद्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. या कायद्यांमुळे महिलांवर होणाऱ्या विविध प्रकारच्या अत्याचारांपासून त्यांना संरक्षण मिळते. समाज माध्यमांच्या माध्यमातून आधुनिक काळात महिलांचे शोषण केले जाते. या शोषणाविरुद्ध आवाज उठवण्याची व्यवस्था प्रचलित कायद्यांमध्ये करण्यात आली आहे. मात्र या कायद्यांची गरज आपणास पडूच नये, असे वाटत असेल तर स्वतःला सक्षम करायला हवे, असे प्रतिपादन ॲड.सुवर्णा मराठे यांनी केले.

येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन. एन. गायकवाड होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांति ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून झाली.

महिलांसंबंधीचे कायदे हे स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आणि स्वतःला सक्षम करण्यासाठी आहेत. या कायद्यांचा दुरुपयोग होऊ नये. राष्ट्रमाता जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले या अगोदर स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या आणि त्यांनी महापुरुष घडवले आणि महापुरुषांना सोबत केली, असेही ॲड.मराठे यांनी सांगितले. विविध कायद्यांची माहिती यावेळी देण्यात आली. प्रास्ताविक युवती सभा प्रमुख डॉ.सी.एस. पाटील यांनी तर सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. जी.एस. अहिरराव यांनी केले. आभार महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.आर.एम. गजभिये यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.दीपक मराठे, प्रा. एस.ए. कोळी, डॉ.अतुल देशमुख, प्रा.शिवाजी पाटील, प्रा.जनार्दन देवरे, डॉ.गजानन चौधरी यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



देशमुख महाविद्यालयात महिला दिनानिमित्त कायदेविषयक मार्गदर्शन.

## कायद्यांचा दुरुपयोग होऊ नये

महिलांसंबंधीचे कायदे हे स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आणि स्वतःला सक्षम करण्यासाठी आहेत. त्यामुळे या कायद्यांचा दुरुपयोग होऊ नये. राष्ट्रमाता जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले या अगोदर स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या आणि त्यांनी महापुरुष घडवले आणि महापुरुषांना सोबत केली, असेही ॲड.मराठे यांनी सांगितले.

# केंद्रीय अर्थसंकल्प पायाभूत सुविधांना प्राधान्य देणारा

## डॉ. साळुंखे : देशमुख महाविद्यालयात व्याख्यान

सकाळ वृत्तसेवा

भडगाव, ता. ११ : यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प पायाभूत सुविधांना प्राधान्य देणारा आहे. मात्र येणाऱ्या काळात पेट्रोल, डिझेल व इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती प्रचंड वाढतील. त्याचप्रमाणे शिक्षण, कृषी, आरोग्य या बाबींवरील अपेक्षित खर्च अर्थसंकल्पात दिसत नाही. विषमुक्त शेतीला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. परंतु पगारदार नोकरदारांचा अपेक्षाभंग करणारा हा अर्थसंकल्प म्हणता येईल, असा मत शेंदुर्णी येथील अप्पासाहेब रघुनाथराव भाऊराव गरुड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य व वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. श्याम साळुंखे यांनी मांडले.



भडगाव : अर्थसंकल्प विषयावर बोलताना डॉ. श्याम साळुंखे.

सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित ''वाणिज्य मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रमात ते उद्घाटक व वक्ते म्हणून बोलत होते. याप्रसंगी त्यांचे ''अर्थसंकल्प २०२२'' या विषयावर व्याख्यान झाले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे कला व वाणिज्य शाखेचे समन्वयक व भूगोल विभागप्रमुख डॉ. एस. डी. भैसे होते. प्रा. एस. ए. कोळी यांनी प्रास्ताविक केले तर वक्त्यांचा परिचय वाणिज्य विभागप्रमुख डॉ. सचिन हडोळतीकर यांनी करून दिला.

डॉ. गजानन चौधरी यांनी सूत्रसंचालन तर प्रा. डॉ. बी. एस. भालेराव यांनी आभार मानले. या प्रसंगी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. एल. जी. कांबळे, वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. एन. व्ही. चिमणकर, प्रा. डी. ए. मस्की, ग्रंथपाल प्रा. रचना गजभिये, मराठी विभागप्रमुख डॉ. अतुल देशमुख, अर्थशास्त्र विभागाचे प्रा. जे. जे. देवरे, इतिहास विभागाचे प्रा. प्रदीप वाघ तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# भडगावच्या देशमुख कॉलेजमध्ये कायदेविषयक मार्गदर्शन

**भडगाव** | महिला संबंधीचे कायदे स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आणि स्वतःला सक्षम करण्यासाठी आहेत. या कायद्यांचा दुरुपयोग होऊ नये. महिलांच्या संरक्षणासाठी संविधानात अनेक कायद्यांची व्यवस्था केली आहे. शोषणाविरूद्ध आवाज उठवण्याची व्यवस्था प्रचलित कायद्यांमध्ये केली आहे. या कायद्यांची गरज आपणास पडूच नये, असे वाटत असेल तर स्वतःला सक्षम करा, असे आवाहन अ‍ॅड. सुवर्णा मराठे यांनी केले. येथील रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड होते. प्रारंभी माँ जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. सी. एस. पाटील, सूत्रसंचालन प्रा. जी. एस. अहिरराव यांनी तर प्रा. आर. एम. गजभिये यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. दीपक मराठे, प्रा. एस. ए. कोळी, डॉ. अतुल देशमुख, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. जनार्दन देवरे, डॉ. गजानन चौधरी यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# देशमुख महाविद्यालयात अर्थसंकल्पावर व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

भडगाव : रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्यावतीने वाणिज्य मंडळाचे उदघाटन नुकतेच आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी शेंदुर्णी येथील अप्पासाहेब रघुनाथराव भाऊराव गरुड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य व वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. श्याम साळुंखे यांचे 'अर्थसंकल्प २०२२' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

तसेच कौशल्याधारित शिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे. स्टार्टअपला चालना देऊन स्वयंरोजगार वाढवण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासनही देण्यात आले आहे, असे प्रतिपादन श्याम साळुंखे यांनी यावेळी केले.

प्रास्ताविक प्रा. एस. ए. कोळी यां केले तर वक्त्यांचा परिचय वाणिज विभागप्रमुख डॉ. सचिन हडोळतीक यांनी करून दिला. सूत्रसंचालन ड गजानन चौधरी यांनी तर आभार प्र डॉ. बी. एस. भालेराव यां मानले.

# केंद्रीय अर्थसंकल्पात कौशल्याधारित शिक्षण देण्यावर भर - डॉ. श्याम साळुंखे

▸▸ भडगाव । प्रतिनिधी

केंद्रीय अर्थसंकल्प पायाभूत सुविधांना प्राधान्य देणारा आहे. मात्र येणाऱ्या काळात पेट्रोल, डिझेल व इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती प्रचंड वाढतील. त्याचप्रमाणे शिक्षण, कृषी, आरोग्य या बाबींवरील अपेक्षित खर्च अर्थसंकल्पात दिसत नाही. विषमुक्त शेतीला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. परंतु पगारदार नोकरदारांचा अपेक्षाभंग करणारा हा अर्थसंकल्प म्हणता येईल. यात नदीजोड योजनांसाठी तरतूद करण्यात आली आहे. ऑनलाइन शिक्षणावर भर देण्यात आला. पण ऑनलाइन शिक्षणासाठी पायाभूत सुविधांची वानवा दिसून येते. असे असले तरी ऑनलाईन विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.

अंगणवाड्यांना सक्षम करण्यासाठी योजना या अर्थसंकल्पात दिसतात. तसेच कौशल्याधारीत शिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे. स्टार्टअपला चालना देऊन स्वयंरोजगार वाढवण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासनही देण्यात आले आहे.

सर्व गोष्टींमधून सरकारला कर संकलन वाढवायचे आहे. या पाठीमागे नागरिकांनी अधिकाधिक खर्च करावा हा सरकारचा हेतू दिसून येतो. असे प्रतिपादन शेंदुर्णी येथील अप्पासाहेब रघुनाथराव भाऊराव गरुड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य व वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. श्याम साळुंखे यांनी केले.

सौ.रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित मवाणिज्य मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रमात ते उद्घाटक व वक्ते म्हणून बोलत होते. याप्रसंगी त्यांचे 'अर्थसंकल्प २०२२' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे कला व वाणिज्य शाखेचे समन्वयक व भूगोल विभागप्रमुख डॉ.एस.डी. भैसे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.एस. ए.कोळी यांनी केले तर वक्त्यांचा परिचय वाणिज्य विभागप्रमुख डॉ. सचिन हडोळतीकर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गजानन चौधरी यांनी तर आभारप्रदर्शन प्रा.डॉ.बी.एस.भालेराव यांनी केले. या प्रसंगी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.एल.जी.कांबळे, वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा.डॉ.एन.व्ही. चिमणकर, प्रा.डी.ए. मस्की, ग्रंथपाल प्रा. रचना गजभिये, मराठी विभागप्रमुख डॉ.अतुल देशमुख, अर्थशास्त्र विभागाचे प्रा.जे.जे.देवरे, इतिहास विभागाचे प्रा.प्रदीप वाघ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



भडगाव : रजनीताई देशमुख महाविद्यालयात कवी कुसुमाग्रज यांना अभिवादन करताना मान्यवर.

# भडगावला देशमुख महाविद्यालयात स्पर्धा

**भडगाव :** येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी विभागातर्फे विविध स्पर्धा व उपक्रम घेण्यात आले. कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी मराठी विभागप्रमुख डॉ. अतुल देशमुख, प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला निवृत्त प्रभारी प्राचार्य प्रा. आर. एल. माळी, उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. दीपक मराठे, प्रा. एल. जी. कांबळे, प्रा. एम. डी. बिर्ला, डॉ. एस. जी. शेलार, डॉ. एन. व्ही. चिमणकर, डॉ. सी. एस. पाटील, प्रा. एस. एम. झाल्टे, प्रा. एस. ए. कोळी, प्रा आर. एम. गजभिये, डॉ. सचिन हडोतीकर उपस्थित होते. डॉ. अतुल देशमुख यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. प्रा. प्रदीप वाघ यांनी आभार मानले.

# देशमुख महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा



## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध स्पर्धा

भडगाव : सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज तथा विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा व उपक्रम घेण्यात आले.

कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांच्या हस्ते माल्यार्पणकरून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मराठी विभागप्रमुख डॉ. अतुल देशमुख यांनी मराठी भाषा दिन आयोजनामागील भूमिका विशद केली.

प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या मराठी भाषा सामान्य ज्ञान प्रश्नमंजुषा मध्ये एकूण १५१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रभारी प्राचार्य प्रा. आर. एल. माळी, उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. दीपक मराठे, प्रा. एल. जी. कांबळे, प्रा. एम. डी. बिर्ला, डॉ. एस.जी.शेलार, डॉ. एन.व्ही. चिमणकर, डॉ. सी.एस.पाटील, प्रा. एस.एम. झाल्टे, प्रा. एस. ए. कोळी, प्रा आर. एम. गजभिये, डॉ. सचिन हडोतीकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अतुल देशमुख यांनी केले तर प्रा. प्रदीप वाघ यांनी उपस्थितांचे आभार मानले.



# देशमुख महाविद्यालयात करिअर कट्टा प्रथम वर्धापन दिन साजरा

▶▶ **भडगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित जागर करिअर कट्टा २०२२-२३ कार्यशाळा संपन्न झाली. सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दूरदृष्टी या प्रणालीद्वारे या कार्यशाळेचे प्रक्षेपण करण्यात आले. या कार्यशाळेत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करियर कट्टा मार्गदर्शन पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. करियर कट्टा उपक्रमांतर्गत मआयएएस आपल्या भेटीलाफ, मउद्योजक आपल्या भेटीलाफ अशाप्रकारे अनेक विद्यार्थीभिमुख उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला दूरदृश्य प्रणालीद्वारे प्राचार्य डॉ.एन.एन. गायकवाड, करिअर कट्टा समन्वयक डॉ.बी.एस. भालेराव, प्रा.जनार्दन देवरे, डॉ. गजानन चौधरी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देशमुख महाविद्यालयात करिअर कट्टयाचा वर्धापन दिन कार्यशाळेत साजरा

शहर प्रतिनिधी | भडगाव

राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्ट्याच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित 'जागर करिअर कट्टा २०२२-२३' कार्यशाळा संपन्न झाली. सौ रजनी ताई नानासाहेब देशमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दूर दृश्य या प्रणालीद्वारे या कार्यशाळेचे प्रक्षेपण करण्यात आले. या कार्यशाळेत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करिअर कट्टा मार्गदर्शन पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. करिअर कट्टा उपक्रमांतर्गत 'आयएएस आपल्या भेटीला', 'उद्योजक आपल्या भेटीला' अशाप्रकारे अनेक विद्यार्थीभिमुख उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला दूर दृश्य प्रणालीद्वारे प्राचार्य डॉ.एन. एन. गायकवाड, करिअर कट्ट्याचे समन्वयक डॉ.बी.एस. भालेराव, प्रा. जनार्दन देवरे, डॉ.गजानन चौधरी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

**व्याख्यानमाला** • भडगाव येथील कार्यक्रमात जयदीप पाटील यांचे प्रतिपादन

# महाविद्यालय व्यक्तिमत्त्व विकासाचे केंद्र

**प्रतिनिधी** | भडगाव

वृद्धपणाकडे झुकलेल्या आई-वडिलांचा विचार करा. खासगी तसेच सरकारी क्षेत्रात नोकरीच्या संधी आहेत; मात्र त्यासाठी क्षमता निर्माण करा. केवळ डिग्रीचा कागद मिळवणे हे महाविद्यालयीन शिक्षणाचे उद्दिष्ट नसावे. महाविद्यालय म्हणजे परिपूर्ण व्यक्तिमत्त्व विकास घडवणारे एक स्वतंत्र ऊर्जाकेंद्र असते. सर्व तरुणांनी स्पर्धा परीक्षांकडे न वळता तुमच्या क्षमतेनुसार उद्योग निवडा; उद्योजक व्हा, असे प्रतिपादन जळगाव येथील नोबेल फाउंडेशनचे संचालक जयदीप पाटील यांनी केले.

येथील रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभागातर्फे 'करिअरच्या विविध संधी' या विषयावर आयोजित कार्यक्रमात जयदीप पाटील प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. नोबेल फाउंडेशन संचालित यशवर्धिनी करियर महायात्रे निमित्त हा कार्यक्रम आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील होते. डॉ. अतुल देशमुख यांनी सूत्रसंचालन व प्रास्ताविक केले. डॉ. ए. एन. भंगाळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. या प्रसंगी प्रा. [illegible] जी. कांबळे, डॉ. एन. व्ही.



भडगाव येथे कार्यक्रमात मार्गदर्शन करताना जयदीप पाटील. सोबत शिक्षक.

चिमणकर, डॉ. सी. एस. पाटील, डॉ. दिनेश तांदळे, प्रा. एस. ए. कोळी, प्रा. आर. एम. गजभिये, डॉ. सचिन हडोळतीकर, प्रा. जनार्दन देवरे यांची उपस्थिती होती.

**अभ्यासू वृत्ती विकसीत करा**

जगाच्या स्पर्धेकडे कानाडोळा करू नका, तुम्ही जगापेक्षा वेगळे नाहीत. आजच्या पाच वर्षे पुढे पाहण्याची अभ्यासू वृत्ती विकसित करा. शेतकरी आई-वडिलांच्या व्यथा समजून घ्या. आपल्या आई-वडिलांचे अश्रू आनंदाश्रूमध्ये रुपांतरीत करा, असे आवाहन या वेळी जयदीप पाटील यांनी केले.



प्रतिमापूजन करून अभिवादन करताना पदाधिकारी.

# भडगाव येथील देशमुख महाविद्यालयात अभिवादन

**भडगाव** | येथील सौ.रजनीताई नानासाहेब देशमुख महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी झाली. पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक दत्तात्रय माणिकराव पवार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ.एन.एन. गायकवाड कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

यावेळी इतिहास विभागप्रमुख डॉ.सी.एस. पाटील यांनी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या बालपणापासून तर राज्याभिषेकापर्यंतच्या विविध प्रसंग, घटनांचा आढावा आपल्या व्याख्यानात घेतला. प्राचार्य डॉ. गायकवाड यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य प्रा.एस.आर. पाटील यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.जी.एस. अहिरराव यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



**भडगाव : भित्तिपत्रकाच्या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड आदी.**

# देशमुख महाविद्यालयात भित्तिपत्रक स्पर्धा

**भडगाव :** येथील रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात इंग्रजी विभागातर्फे आंतरराष्ट्रीय इंग्रजी भाषा दिनानिमित्त कार्यक्रम झाला. इंग्रजी विभागातर्फे भित्तिपत्रक प्रदर्शन व स्पर्धा झाली. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. एल. जी. कांबळे यांनी उद्घाटन केले. प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड अध्यक्षस्थानी होते. इतिहास विभागप्रमुख डॉ. चित्रा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. स्पर्धेत अश्विनी पाटील (तृतीय वर्ष कला) हिने प्रथम, विद्या वाघ (द्वितीय वर्ष कला) हिने द्वितीय, तर रेणुका पवार (प्रथम वर्ष कला) हिने तृतीय क्रमांक मिळाला. प्रा. एल. जी. कांबळे व डॉ. एन. व्ही. चिमणकर यांच्याकडून बक्षिसे देण्यात आली. इंग्रजी विभागप्रमुख प्रा. शिवाजी पाटील यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. डॉ. जनार्दन देवरे यांनी आभार मानले. धनश्री सोनवणे, हेमांगी सूर्यवंशी, पूजा पाटील, नेहा भोई, अश्विनी इंगळे, करिष्मा तडवी, जयश्री खैरनार, दिव्या वाडेकर, धनश्री भालेराव, भाग्यश्री बागूल, नेहा मोलसे, आरती पाटील, विशाल कोळी यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला.



भडगाव : यशस्वी विद्यार्थिनीचा गौरव करताना अध्यक्ष संजय वाघ. शेजारी व्ही. टी. जोशी, डॉ. एन. एन. गायकवाड आदी.

# 'गांधी विचार परीक्षेत' देशमुख महाविद्यालयाचे यश

सकाळ वृत्तसेवा

भडगाव, ता. २२ : रिसर्च फाउंडेशन, जळगावतर्फे दर वर्षी घेण्यात येणाऱ्या 'राज्यस्तरीय गांधी विचार संस्कार परीक्षा २०२१'मध्ये संपूर्ण जळगाव जिल्ह्यातून पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने घवघवीत यश प्राप्त केले.

महाविद्यालयातील तृतीय वर्ष वाणिज्य वर्गाची विद्यार्थिनी दिव्या ज्ञानेश्वर वाडेकर हिने तृतीय वर्ष गटातून प्रथम क्रमांक मिळवीत सुवर्णपदक पटकावले तर तृतीय वर्ष कला वर्गाची विद्यार्थिनी करिष्मा राजू तडवी हिने जळगाव जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक मिळवीत रजतपदक प्राप्त केले. विशेष उल्लेखनीय म्हणजे महाविद्यालयाने या परीक्षेत सतत सहा वर्षे यश प्राप्त केले आहे. या यशाबद्दल पदकप्राप्त विद्यार्थिनींचा पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे चेअरमन संजय वाघ व व्हाईस चेअरमन व्ही. टी. जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील, कला-वाणिज्य शाखेचे समन्वयक डॉ. एस. डी. भैसे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. एल. जी. कांबळे उपस्थित होते. गांधी विचार संस्कार परीक्षेचे समन्वयक म्हणून डॉ. सचिन हडोळतीकर यांनी यशस्वीपणे जबाबदारी पार पाडली. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

# देशमुख महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय इंग्रजी दिनानिमित्त भित्तीपत्रक स्पर्धा

▸▸ भडगाव । प्रतिनिधी

सौ.रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात इंग्रजी विभागातर्फे 'आंतरराष्ट्रीय इंग्रजी भाषा दिवस' साजरा करण्यात आला. जगप्रसिद्ध कवी व नाटककार शेक्सपिअर यांची जयंती जगभर आंतरराष्ट्रीय इंग्रजी भाषा दिवस म्हणून साजरी केली जाते. इंग्रजी विभागातर्फे भित्तिपत्रक प्रदर्शन व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यात्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर भित्तीपत्रक सादर केले.

स्पर्धेचे उद्घाटन अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. एल.जी.कांबळे यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एन.एन. गायकवाड होते. इतिहास विभागप्रमुख डॉ.चित्रा पाटील यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

या स्पर्धेत अश्विनी सुनील पाटील (तृतीय वर्ष कला) या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकवला. विद्या कोमल वाघ (द्वितीय वर्ष कला) या विद्यार्थिनीला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला तर रेणुका मांगो पवार (प्रथम वर्ष कला) या विद्यार्थिनीला तृतीय क्रमांक मिळाला. प्रा.एल. जी.कांबळे व डॉ.एन.व्ही.चिमणकर यांच्याकडून विजेत्या विद्यार्थ्यांना रोख बक्षीस देण्यात आले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन इंग्रजी विभागप्रमुख प्रा.शिवाजी पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन



डॉ.जनार्दन देवरे यांनी केले. धनश्री विजय सोनवणे, हेमांगी संभाजी सूर्यवंशी, पूजा वाल्मिक पाटील, नेहा संजय भोई, अश्विनी विनोद इंगळे, करिष्मा राजू तडवी, जयश्री संजय खैरनार, दिव्या वाडेकर, धनश्री चंद्रकांत भालेराव, भाग्यश्री सोनीराम बागूल, नेहा संजय सोलसे, आरती राजेंद्र पाटील, विशाल कोळी या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला.



दिव्या वाडेकर हिचा गौरव करताना व्ही. टी. जोशी. सोबत संजय वाघ आदी.

# गांधी विचार परीक्षेत देशमुख कॉलेजचे यश

**शहर प्रतिनिधी | भडगाव**

जळगाव येथील गांधी रिसर्च फाउंडेशनतर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय गांधी विचार संस्कार परीक्षेत पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचालित रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने घवघवीत यश प्राप्त केले आहे.

या परीक्षेत महाविद्यालयातील तृतीय वर्ष वाणिज्य विभागातील दिव्या ज्ञानेश्वर वाडेकर या विद्यार्थिनीने तृतीय वर्ष गटातून प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदक पटकावले. तर तृतीय वर्ष कला वर्गाची करिष्मा राजू तडवी या विद्यार्थिनीने जळगाव जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक मिळवत रजतपदक प्राप्त केले. महाविद्यालयाने या परीक्षेत सतत सहा वर्षापासून यशाची परंपरा यंदाही काम राखली आहे. पदक प्राप्त विद्यार्थिनींचा पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे चेअरमन संजय वाघ व व्हॉइस चेअरमन व्ही. टी. जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील, कला, वाणिज्य शाखेचे समन्वयक डॉ. एस. डी. भैसे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. एल. जी. कांबळे उपस्थित होते. गांधी विचार संस्कार परीक्षेचे समन्वयक म्हणून डॉ. सचिन हडोळतीकर यांनी जबाबदारी पार पाडली. या यशाबद्दल सर्व प्राध्यापक, कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी दिव्या वाडेकर तसेच करिष्मा तडवी यांचे कौतुक केले आहे.

# देशमुख महाविद्यालयात व्याख्यान

भडगाव, ता. १८ : येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष तथा माजी आमदार लोकनेते स्वर्गीय ओंकारआप्पा वाघ यांच्या जयंतीनिमित्ताने 'खानदेशचा ढाण्या वाघ : लोकनेते ओंकारआप्पा वाघ एक झंझावात' या गौरवग्रंथाच्या लेखिका हेमलता पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक विनय जकातदार अध्यक्षस्थानी होते. गो. से. हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्यामकांत पाटील व प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

हेमलता पाटील यांनी व्याख्यानात ओंकारआप्पांचे चरित्र आणि त्यांच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. समाजवादी विचारसरणीच्या माध्यमातून त्यांनी राजकीय सत्ता समाजातील तळागाळातल्या माणसापर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे खानदेशातील सर्वसामान्य माणूस त्यांचे सदैव स्मरण करीत राहील, असे अध्यक्षीय मनोगतात विनय जकातदार यांनी सांगितले. प्रा. जी. एस. अहिरराव यांनी सूत्रसंचालन केले.

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

# देशमुख महाविद्यालयात भित्तीपत्रक स्पर्धा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**भडगाव** : रजनी देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात इंग्रजी विभागातर्फे आंतरराष्ट्रीय इंग्रजी भाषा दिवस साजरा करण्यात आला. जगप्रसिद्ध कवी व नाटककार शेक्सपिअर यांची जयंती जगभर आंतरराष्ट्रीय इंग्रजी भाषा दिवस म्हणून साजरी केली जाते. इंग्रजी विभागातर्फे भित्तीपत्रक प्रदर्शन व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर भित्तीपत्रक सादर केले.

स्पर्धेचे उद्‌घाटन अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. एल.जी. कांबळे यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन.एन. गायकवाड होते. इतिहास विभागप्रमुख डॉ. चित्रा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

या स्पर्धेत अश्विनी सुनील पाटील या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकवला. विद्या कोमल वाघ द्वितीय, तर रेणुका मांगो पवार तृतीय आली.

प्रा. एल.जी. कांबळे व डॉ. एन.व्ही. चिमणकर यांच्याकडून विजेत्या विद्यार्थ्यांना रोख बक्षीस देण्यात आले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन इंग्रजी विभागप्रमुख प्रा. शिवाजी पाटील यांनी केले, तर आभार डॉ. जनार्दन देवरे यांनी मानले.

धनश्री विजय सोनवणे, हेमांगी संभाजी सूर्यवंशी, पूजा वाल्मीक पाटील, नेहा संजय भोई, अश्विनी विनोद इंगळे, करिश्मा राजू तडवी, जयश्री संजय खैरनार, दिव्या वाडेकर, धनश्री चंद्रकांत भालेराव, भाग्यश्री सोनीराम बागूल, नेहा संजय सोलसे, आरती राजेंद्र पाटील, विशाल कोळी या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला.



भडगाव येथे भित्तीपत्रक स्पर्धेप्रसंगी उपस्थित डॉ. एन.एन. गायकवाड, स्नेहा गायकवाड, प्राध्यापक व विद्यार्थिनी.

# प्रा. जनार्दन देवरे यांना पीएच.डी. पदवी जाहीर



देवरे यांना पत्र देताना कुलगुरु.

**भडगाव** | येथील रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व महिंदळे येथील रहिवासी प्रा. जनार्दन जानजी देवरे यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने पीएच.डी. पदवी जाहीर केली आहे. त्यासंबंधीचे नोटिफिकेशन प्र-कुलगुरू प्रा.डॉ. एस. टी. इंगळे यांच्या हस्ते त्यांना बहाल केले.

# राजर्षी शाहू महाराजांना भडगावात अभिवादन

## स्मृती शताब्दीनिमित्त देशमुख कॉलेजात कार्यक्रम

प्रतिनिधी | भडगाव

लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांना त्यांच्या स्मृति शताब्दीनिमित्त येथील रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अभिवादन करण्यात आले. सकाळी १० वाजता सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांनी १०० सेकंद जागेवर स्तब्ध उभे राहून कृतज्ञतापूर्वक आदरांजली अर्पण केली.

प्रारंभी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.सचिन हडोळतीकर व बहिस्थ परीक्षक डॉ.बालाजी पाटील यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर '१०० सेकंद कृतज्ञतेचे' या संकल्पने मागील भूमिका मराठी विभागप्रमुख डॉ.अतुल देशमुख यांनी विशद केली. राजर्षी शाहू महाराजांनी राजेशाहीमध्ये लोकशाहीची तत्त्वे रुजवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांनी आरक्षणासारख्या महत्त्वाच्या तत्वाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात सर्वप्रथम शोषित, पीडित, वंचितांसाठी आरक्षणाची सुरुवात केली. त्याच आधारावर भारतीय राज्यघटनेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षणाचा कायदा लागू केल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.एस.जी. शेलार होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.ए.एन. भंगाळे यांनी केले तर आभार जयंती-पुण्यतिथी समितीचे अध्यक्ष डॉ.एन. व्ही. चिमणकर यांनी मानले. कार्यक्रमास समन्वयक डॉ.एस. डी. भैसे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.एल.जी. कांबळे, प्रा.एस. एम. झाल्टे, डॉ.सी. एस. पाटील, प्रा.डी.ए. मस्की, डॉ.बी.एस. भालेराव, प्रा.आर.एम. गजभिये, प्रा.शिवाजी पाटील, प्रा. प्रदीप वाघ, डॉ.गजानन चौधरी, राजेंद्र मराठे, अजय देशमुख, संदीप केदार, दिलीप चौधरी, दिलीप तडवी, भूषण मोरे, तुळशीराम महाजन व विद्यार्थी उपस्थित होते.

### राजा शिवछत्रपती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने अभिवादन

यशवंत नगर भोईवाडा येथे राजा शिवछत्रपती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने राजर्षी शाहू महाराजांना स्मृति शताब्दीनिमित्त अभिवादन करण्यात आले. नरेंद्र पाटील यांनी प्रतिमा पूजन केले. यावेळी भूषण पाटील, रुपाली पाटील, छायाबाई पाटील आदी उपस्थित होते.

# देशमुख महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन

**भडगाव । प्रतिनिधी**



लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांना त्यांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले. सकाळी ठीक १० वाजता सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांनी १०० सेकंद जागेवर स्तब्ध उभे राहून छत्रपती राजर्षी शाहू महाराजांना कृतज्ञतापूर्वक आदरांजली अर्पण केली.

प्रारंभी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सचिन हडोळतीकर व बहिस्थ परीक्षक डॉ. बालाजी पाटील यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर '१०० सेकंद कृतज्ञतेचे' या संकल्पनेमागील भूमिका मराठी विभागप्रमुख डॉ. अतुल देशमुख यांनी विशद केली. ते म्हणाले की, छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी राजेशाहीमध्ये लोकशाहीची तत्त्वे रुजवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांनी आरक्षणासारख्या महत्त्वाच्या तत्वाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात सर्वप्रथम शोषित, पिडित, वंचितांसाठी आरक्षणाची सुरुवात केली. त्याच आधारावर भारतीय राज्यघटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षणाचा कायदा लागू केला. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त १०० सेकंद स्तब्धपणे उभे राहून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हीच त्यांना खरी मानवंदना ठरेल.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. एस. जी. शेलार होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. ए. एन. भंगाळे यांनी केले तर आभार जयंती-पुण्यतिथी समितीचे अध्यक्ष डॉ. एन.व्ही. चिमणकर यांनी मानले.

अभिवादन कार्यक्रमाला कला व वाणिज्य शाखेचे समन्वयक डॉ. एस.डी. भैसे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. एल.जी. कांबळे, प्रा. एस. एम. झाल्टे, डॉ. सी.एस. पाटील, प्रा.डी. ए. मस्की, डॉ.बी.एस. भालेराव, प्रा. आर. एम. गजभिये, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. प्रदीप वाघ, डॉ. गजानन चौधरी, राजेंद्र मराठे, अजय देशमुख, संदीप केदार, दिलीप चौधरी, दिलीप तडवी, भूषण मोरे, तुळशीराम महाजन व विद्यार्थी उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

## देशमुख महाविद्यालय

▶▶ भडगाव । प्रतिनिधी

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जयंती सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक नानासाहेब देशमुख उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड हे वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांचे यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला उजाळा देणारे व्याख्यान झाले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या शुभहस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. प्रा. एस. एम. झाल्टे व डॉ. बी.एस. भालेराव यांनी बुद्ध वंदना म्हटली.

डॉ. एन. एन. गायकवाड यांनी आपल्या व्याख्यानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी बोलताना म्हणाले की, बाबासाहेबांना जन्मापासूनच आपल्या आयुष्यात अनेक संघर्षपूर्ण प्रसंगांना सामोरे जावे लागले. संविधानाच्या प्रत्येक कलमातून आणि संविधान सभेत झालेल्या चर्चेतून बाबासाहेबांच्या विद्वत्तेचे दर्शन घडते. त्यांनी उभ्या केलेल्या संस्थात्मक कार्यातून आधुनिक भारताचा पाया रचला गेला. पीपल्स एज्युकेशन सोसायटी हे त्यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयंती पुण्यतिथी समितीचे अध्यक्ष डॉ. एन.व्ही. चिमणकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डी.ए. मस्की यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. आर.एम. गजभिये यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. एस.आर.जाधव यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस.डी.महाजन, उपप्राचार्या डॉ. उज्वल आर. मगर, उपप्राचार्य डॉ. जी.डी.देशमुख, उपप्राचार्य डॉ.पी.जे. परमार, कार्यालयीन अधीक्षक ए.बी. सूर्यवंशी, डॉ.आर.पी.निकम उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन आणि माल्यार्पण करून अभिवादन केले.

प्राचार्य डॉ.एस.आर.जाधव उपस्थितांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन कार्य प्रवास या विषयावर मार्गदर्शन केले. यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य मा.डॉ. एस. डी.महाजन,विद्यार्थी विकास विभागाचे प्रमुख व उपप्राचार्य डॉ. जी.डी.देशमुख,उपप्राचार्या डॉ.उज्वल मगर,उपप्राचार्य डॉ.पी.जे.परमार यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. मंगेश देशमुख,श्री पांडूरंग सोनवणे,श्री. कैलास चौधरी,श्री.आर.पी. करनकाळ,श्री.विजय वानखेडे,श्री. आनंद पाटील यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन डॉ. आर.पी.निकम तर आभार उपप्राचार्य डॉ.पी.जे. परमार यांनी मानले.

## वरखेडी

▶▶ वरखेडी,, ता पाचोरा । वार्ताहर

येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथम बाबासाहेबांच्या पुतळयाला वरखेडीच्या सौ अलका धनराज विसपुते शेतकरीसंघ पाचोरा संचालक व ग्रा.प. जेष्ठ सदस्य डिगंबर त्र्यंबक पाटील,ग्रा प सदस्य संजय लक्ष्मण पाटील, धनराज विसपुते, यांनी पुष्पहार अर्पण केले.

या वेळी वरखेडी गावाचे ग्रा.प सदस्य योगेश चौधरी, राकेश नाना पाटील, संजय ...

यांची प्रमुख उपस्थिती होती. यावे[ळी] काशिनाथ सुरवाडे, शिवाजी बागु[ल] मनोज गायकवाड, नितीन सोनव[णे] पिराजी सुरवाडे, संजय बागुल, अ... गायकवाड,सुदाम सपकाळे, प्र... सपकाळे, मधुकर सुरवाडे यां... सह उपस्थित मान्यवरांनी व स... बांधवानी पुष्पहार अर्पण क[रून] अभिवादन केले.

## आदर्श विद्यालय

▶▶ पारोळा । प्रतिनिधी


येथील न्यू पीपल्स एज्यु... सोसायटी संचलित आदर्श मा... विद्यालय व्यंकटेशनगर शाळेत... नव डॉ बाबासाहेब आंबेडक[र] जयंती उत्साहात साजरा क... आली. कार्यक्रमाच्या अध्य... मुख्याध्यापक डॉ शांताराम पाटील होते त्यांनी ... भाषणात भारतीय राज्यघट[ना] ...ती व लोकशाही निर्माण ... बाबासाहेबांचे योगदान विष... यावेळी डी.बी. पाटील, ... पाटील, एस. आर. पाटील ... पाटील, सी.एम. पाटील ... विसावे, गणेश पाटील व ... सोनवणे उपस्थित होते.

## शाहिर परिष[द]

▶▶ नगरदेवळा,ता.पाचो[रा]

नगरदेवळा येथील मह... परिषद शाखा जळगाव ... लोकरंग फाउंडेशन ... तसेच एस.के पवार ... डॉक्टर बाबासाहेब ... यांच्या जयंतीनिमित्त श... कार्यालयात डॉक्टर आं[बेडकर] अभिवादन कार्यक्रमाचे ... करण्यात आले होते य... परिषदेचे जिल्हाध्यक्ष ... फाउंडेशनचे अध्यक्ष म...

देशदूत
www.deshdoot.com
/deshdoot /deshdoot /deshdoot Daily Newsgram
जळगाव ।



# जातीपातीच्या भिंतीवर शिक्षणाचे आसूड- प्रा.डॉ.पाटील

**भडगाव । प्रतिनिधी**

गोरगरीब, वंचीत, मुस्लिम अनाथासाठी शिक्षणाची गंगा ज्योतिबा फुलेंनी स्व: कर्तुत्वाने व विचारांतून निर्माण केलीचांगल्या कार्याची सुरुवात घरातून केली पाहिजे, तन, मन, धनाने सर्वस्व अर्पण करणारे ज्योतिबा शिक्षण महर्षी होय, असे विचार प्रा. डॉ. चित्रा पाटील, इतिहास विभाग यांनी व्यक्त केले. ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती निमित्ताने प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. डॉ. संजय भैसे होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, कार्यक्रमासाठी प्रा.एल. जी.कांबळे, प्रा.एस. ए.कोळी, प्रा. डि. एच. तांदळे, प्रा. डॉ.बी.एस भालेराव, प्रा डॉ एस.एन. हडोलतीकर,प्रा शिवाजी पाटील, गजानन चौधरी, जनार्दन देवरे प्रदीप वाघ संदीप केदार, अजय देशमुख भूषण मोरे उपस्थित होते. सूत्रसचालन प्रा.रचना गजभिये यांनी व आभार प्रा.देवेंद्र मस्की यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन जयंती उत्सव समिती व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्यक्तिमत्त्व विकास शिबिरात ६० तरुणींचा सहभाग

**प्रतिनिधी** | भडगाव

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे विद्यार्थिनींसाठी एकदिवसीय व्यक्तिमत्त्व विकास शिबिर आयोजित करण्यात आले होते. यात रजनीताई नानासाहेब देशमुख महाविद्यालय आणि पाचोरा येथील मुरलीधरजी मानसिंगका साहित्य, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील एकूण ६० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.

उद्घाटक म्हणून नगरसेविका सुचेता वाघ यांची उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील तर प्रमुख पाहुण्या म्हणून रेखा पाटील, सुनीता वारुळे व डॉ. एस. डी. भैसे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांच्या उपस्थितीत समारोप झाला. शिबिरास प्रा.डॉ. दीपक मराठे, प्रा. डॉ. चित्रा पाटील, प्रा. शिवाजी पाटील, डॉ. दिनेश तांदळे, प्रा. एल.



देशमुख महाविद्यलयात आयोजित शिबिरात सहभागी मान्यवर.

जी. कांबळे, डॉ. गजानन चौधरी, डॉ. क्रांती सोनवणे, प्रा. स्नेहा गायकवाड यांनी सहकार्य केले. शिबिरात वक्त्या प्रा.डॉ. लीना ढाके यांनी महिला सक्षमीकरणातील अडचणी, डॉ. अतुल देशमुख यांनी स्पर्धा परीक्षा व मुलाखत तंत्र, डॉ. जे. व्ही. पाटील यांनी व्यक्तिमत्व विकास तर डॉ. सुवर्णा पाटील यांनी 'स्त्रियांचे आरोग्य' याबाबत मार्गदर्शन केले.

# शारीरिक, मानसिक आरोग्याची जपणूक करावी

## डॉ. एन. एन. गायकवाड : भडगावला स्वयंसिद्धा उपक्रमांतर्गत कराटे प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**सकाळ वृत्तसेवा**

भडगाव, ता. १ : विद्यार्थिनींनी शारीरिक व मानसिक आरोग्याची जपणूक करावी. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये प्रगती करून आपल्या परिवाराचे नाव उज्वल करावे. महिलांनी सर्वच क्षेत्रात आघाडी घेतली आहे. त्यामुळे परिस्थितीशी दोन हात करण्याची क्षमता देखील विकसित करावी, अशी अपेक्षा प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी व्यक्त केली.

ते सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या व




**भडगाव : कराटे प्रशिक्षण शिबिर समारोप कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड आदी.**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे आयोजित स्वयंसिद्धा उपक्रमांतर्गत कराटे प्रशिक्षण शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील हे होते. यावेळी माजी नगरसेविका योजना पाटील, प्राजक्ता देशमुख, महिला दक्षता समितीच्या सदस्या रेखा पाटील उपस्थित होत्या. महाविद्यालयात २१ते २८ मार्च या आठ दिवसात कराटे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत महिलांवर होणाऱ्या आक्रमणास कसा विरोध करावा तसेच चाकूहल्ला, लाठीहल्ला यापासून आपले स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबत प्रशिक्षक संदीप मनोरे, ऋषिकेश पाटील व स्वप्निल पाटील यांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

विद्यार्थिनींनी आभ्यासासोबत क्रीडांगणावर विविध खेळ खेळावेत त्यातून त्यांचे मानसिक संतुलन चांगले राहील, असे मत प्रशिक्षक संदीप मनोरे यांनी व्यक्त केले. सदर शिबिराचे उद्घाटन २१ मार्च रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

शिबिर यशस्वितेसाठी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. दीपक मराठे, साहाय्यक प्रा. डॉ. चित्रा पाटील, प्रा. शिवाजी पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. शिबिरात महाविद्यालयातील ५० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा भोई हिने तर संजना शेलार हिने आभार व्यक्त केले.

# देशमुख महाविद्यालयात इंग्रजी विभागातर्फे 'स्पोकन इंग्लिश वर्कशॉप'

**▸▸ भडगाव । प्रतिनिधी**

पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित, सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात इंग्रजी विभागातर्फे मस्पोकन इंग्लिश वर्कशॉपफ आयोजित करण्यात आले होते. यावेळी वक्ते म्हणून दादासाहेब दिगंबर शंकर पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, एरंडोल येथील इंग्रजी विभागाचे डॉ. हेमंत पाटील उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. हेमंत पाटील म्हणाले, की इंग्रजी ही संभाषणासाठी सर्वात सोपी भाषा आहे. दैनंदिन जीवनात व परिस्थितीनुसार बोलल्या जाण्याच्या दृष्टीनें इंग्रजी भाषेच्या व्याकरणाचा उपयोग केलाच पाहिजे, असे बंधनकारक नसते; तसेच आवश्यक देखील नसते. इंग्रजी भाषेचा वापर करताना तिच्यात सहजता असणे आवश्यक असते. इंग्रजी ही गंमतीदार भाषा असून शिकायला सहजसोपी आहे. कुठल्याही भाषेच्या संदर्भात काळाचा वापर हा आत्मा असला तरी तोडक्या-मोडक्या शब्दांचा उपयोग करून आपण जीवनात इंग्रजीचा प्रयोग संभाषणासाठी करू शकतो. इंग्रजी ही भाषा संभाषणासाठी वापरत असताना आपल्या बोलीभाषेचा तिच्यावर परिणाम होतो. हा परिणाम आपण लक्षात घेतला पाहिजे. इंग्रजी भाषेमुळे वेगवेगळ्या क्षेत्रांतील ज्ञान आपणास मिळते.

कार्यशाळेचे अध्यक्षस्थानी प्राचार्य. डॉ. एन. एन. गायकवाड होते. त्यांनी यावेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. डॉ. हेमंत पाटील यांनी इंग्रजी भाषेतील विविध उदाहरणांच्या माध्यमातून संभाषण कसे करावे, याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्याचबरोबर इंग्रजी भाषेची गोडी लागावी व वाचन वाढावे यासाठी काय करता येईल, यासंबंधीची माहिती दिली. कार्यशाळेला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. त्याचबरोबर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. एल.जी. कांबळे, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. एन.व्ही. चिमणकर, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.डी. एम. मराठे, प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ.ए.एन. भंगाळे, प्रा.डी. ए. मस्की, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.बी.एस. भालेराव, ग्रंथपाल प्रा.आर. एम. गजभिये, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. सचिन हडोळतीकर, मराठी विभागप्रमुख डॉ. अतुल देशमुख, प्रा. जनार्दन देवरे, डॉ. गजानन चौधरी यांचीही यावेळी उपस्थिती होती. सूत्रसंचालन इंग्रजी विभागप्रमुख प्रा.शिवाजी पाटील यांनी केले तर आभारप्रदर्शन इतिहास विभागप्रमुख डॉ.चित्रा पाटील यांनी केले.

**जल दिनानिमित्त उपक्रम** • 'महिलांच्या कायदेविषयक तरतुदी व अधिकार' या विषयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

# भडगाव येथे आयोजित शिबिरात कायद्याचे धडे

शहर प्रतिनिधी | भडगाव

भडगाव तालुका विधी सेवा समिती व भडगाव तालुका वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक जल दिनानिमित्त विविध कायदे विषयावर दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या आवारात कायदेशीर शिबिराचे २३ रोजी दुपारी २ वाजता आयोजन केले होते.

प्रमुख वक्ते म्हणून भडगाव येथील सहायक सरकारी अभियोक्ता व्हि. डी. मोतीवाले यांची उपस्थिती होती. त्यांनी 'महिलांच्या कायदेविषयक तरतुदी व अधिकार' या विषयांवर विचार व्यक्त केले. ॲड. अशोक बाग यांनी हुंडा घेणे व देणे कसा गुन्हा आहे, याविषयी माहिती दिली. ॲड. के. टी. पाटील यांनी पाण्याचे महत्व व जलप्रदूषण यावर विचार मांडलेत. ॲड. नीलेश तिवारी यांनी वायू प्रदुषण या विषयांवर विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भडगाव येथील न्यायाधीश ईश्वर ठाकरे तर प्रमुख पाहुणे म्हणून सरकारी वकील व्हि. डी. मोतीवाले, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. नीलेश तिवारी, उपाध्यक्ष ॲड. सिद्धार्थ वानखेडे, सेक्रेटरी ॲड. एस. आर. सोनवणे, बार असोसिएशनचे सदस्य ॲड. शिसोदे, ॲड. एम. बी. पाटील, ॲड. के. टी. पाटील, ॲड. भय्यासाहेब अहिरे, ॲड. प्रकाश तिवारी, ॲड. आर. के. वाणी, ॲड. ए. डी. बाग, ॲड. के. ए. पवार, ॲड. मानसिंग परदेशी, ॲड. संजीदा शेख, ॲड. सुवर्णा मराठे, ॲड. भरत ठाकरे, ॲड. विजय महाजन आदी हजर होते.



भडगाव येथील शिबिरात मार्गदर्शन करताना व्ही. डी. मोतीवाले. सोबत मान्यवर.

## व्यवस्थित बाजू मांडल्यास पुरुषांना मिळतो न्याय

सहाय्यक सरकारी अभियोक्ता व्ही. डी. मोतीवाले म्हणाले की, महिलांच्याच बाजुने कायदे असल्याचा गैरसमज पुरुषावर्गात झालेला आहे. त्यांनी आपली बाजू व्यवस्थित व कायदेशीर पद्धतीने मांडल्यास त्यांना ही न्याय मिळू शकतो. महिला आता अबला राहिल्या नाहीत. त्या सबला झालेल्या आहेत. महिलांवर काही अन्याय, अत्याचार झाल्यास किंवा कुणी तीला शारिरीक, मानसिक व आर्थिक त्रास, छळ केल्यास त्यांना विविध कायद्यानुसार न्याय मागता येतो. तसेच पोटगी व कौटुंबिक अत्याचारापासून महिलांचे संरक्षण कायदा अंतर्गत खावटी, घरभाडे, वैद्यकीय खर्च व नुकसानभरपाई मागता येते. दिवाणी व हिंदू विवाह कायद्यान्वये ही खावटी व खर्च मागता येते. तसेच वडील व पतीकडून जमीन व घर या मिळकतीबाबतीत हिस्यासाठी कोर्टात दाद मागता येते, असे त्यांनी सांगितले. या वेळी ॲड. मोतीवाले यांनी उपस्थितांना वेगवेगळ्या कायद्यांची विस्तृत माहिती दिली.